पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८० ■ मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com







## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे निधन




प्रतिनिधी ६ जानेवारी

**पुणे** : माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे मंगळवारी (दि. ६) पहाटे निधन झाले, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून कलमाडी यांच्यावर पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार चालू होते. मात्र आज पहाटे ३.३० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. सुरेश कलमाडी यांनी त्यांच्या कार्यकाळात राजकीय जबाबदाऱ्यांबरोबरच भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे अध्यक्षपदही भूषवले होते. याशिवाय ते प्रदीर्घ काळ पुण्यातून खासदार म्हणून निवडून जात होते. शिवाय त्यांनी अल्पकाळ रेल्वे राज्यमंत्री म्हणूनही कार्यभार पाहिला होता. राजकारणात येण्याआधी सुरेश कलमाडी हे १९६४ ते १९७२ या काळात भारतीय हवाई दलात पायलट म्हणून कार्यरत होते. १९७४ साली ते सेवेतून निवृत्त झाले आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत झाले. तिथून त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली.

# महापालिकेचा महापौर कोण ?

## ◆ महापौरपदाच्या आरक्षणाची प्रतीक्षा !

प्रतिनिधी ६ जानेवारी



**अकोला** : अकोला महापालिकेच्या रणधुमाळीला जोरात सुरूवात झाली असून, नगरसेवक पदाचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते गल्लीबोळा पिंजून काढत असतानाच अद्याप महापालिकेच्या महापौरपदाचे आरक्षण घोषित झाले नसल्याने अनेकांची धाकधूक वाढली आहे. तसेच महानगरपालिकेचा नवा महापौर कोण होणार, कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण निघणार, याची उत्सुकता व प्रतीक्षा कायम असून नगर विकास विभागाच्या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अकोला महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी रविवारपासून प्रचाराची अधिकृत सुरुवात झाली असून, शहरात राजकीय वातावरण तापू लागले आहे. उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. १३ जानेवारीला सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रचाराची मुदत आहे. त्यामुळे उमेदवारांना अवघे आठ दिवस मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी मिळाले आहेत. प्रचार सभा, रोड शो, कोपरा बैठका, रॅली, तसेच घरोघरी जाऊन मतदारांचा मतरूपी आशीर्वाद घेण्यासाठी उमेदवारांची धावपळ सुरू आहे.




दरम्यान, भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार), शिंदेसेना, उद्धवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात महापालिकेवर सत्ता मिळविण्यासाठी दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. मात्र, महापौरपदाचे आरक्षण स्पष्ट नसल्याने कोणत्या प्रवर्गातील व्यक्ती अकोल्याचा पहिला नागरिक ठरणार, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. त्यामुळे महापौरपदाची स्वप्ने पाहणाऱ्या इच्छुकांची 'धडधड' वाढत आहे.

### महापौर आरक्षण विलंबामागेही राजकारण?

◆ राज्यातील २२ महापालिकांमध्ये अद्याप महापौरपदाचे आरक्षण जाहीर झालेले नाही. त्यामुळे या विलंबामागे सत्ताधाऱ्यांचे राजकारण असू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. आधीच आरक्षण जाहीर केल्यास पक्षांतर्गत स्पर्धा वाढते आणि त्यातून अंतर्गत राजकारण तापते. त्यामुळे इच्छुकांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शेवटच्या क्षणी आरक्षण जाहीर करण्याची खेळी खेळली जात असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

### एक दिवस आधीही करता येते आरक्षण जाहीर!

◆ राज्य निवडणूक आयोगाच्या आरक्षण निकालाच्या अगदी एक दिवस आधीसुद्धा जाहीर करता येते. त्यामुळे मतदानाच्या दिवशीही आरक्षण जाहीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या तरी राज्य शासनाकडून महापौरपदाच्या आरक्षणाबाबत कोणतीही हालचाल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण गुरूवारी अकोल्यात

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला** : भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांचे राजराजेश्वर नगरीमध्ये गुरूवार, ८ जानेवारी रोजी आगमन होत आहे. शहरातील बुद्धिजीवी, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, इंजिनियर तसेच धार्मिक सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधतील.



स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे ८ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता संवादाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या उमेदवारांच्या महानगरपालिकेतील कामकाजाबद्दल संवाद साधणार आहे.

वेगवेगळ्या पद्धतीने भारतीय जनता पक्षाने प्रचार अभियान सुरू केले आहे. पदयात्रा, बैठका तसेच महाविकास संकल्पना आदींच्या माध्यमातून राज राजेश्वर नगरीतील मतदार राजा हाच खरा मालक आणि राजराजेश्वराच्या स्वाभिमान विकासाच्या संदर्भात मते जाणून घेतली होती. त्या अनुषंगाने महाविकास

### महापालिका संदर्भात नागरिकांशी संवाद साधणार

संकल्पना प्रकाशित करण्यात आली. वेगवेगळ्या माध्यमातून प्रचारा अभियान भाजपाने सुरू केला आहे या अभियानाला गती देण्यासाठी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण येत असून सामाजिक क्षेत्रातील नागरिकांशी संवाद साधण्याचा हा अभिनव प्रयोग भाजपाने केला आहे. या संवाद बैठकीत जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश कुंडकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार अमोल मिटकरी, विजय अग्रवाल, राष्ट्रवादीचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख, जयंत मसने, किशोर पाटील, कृष्णा शर्मा तसेच भाजपा राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहतील. संवाद सभेला वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीतर्फे करण्यात आली आहे.

# 'नोटा'चा पर्याय देत मतदान घेण्याची तरतूद कायद्यात नाही!

प्रतिनिधी ६ जानेवारी

**मुंबई** : बिनविरोध निवडणुकीची तरतूद कायद्यातच असून, निवडणुकीत एकच उमेदवार असल्यास त्यापुढे 'नोटा' हा पर्याय देऊन निवडणुका घेण्याची तरतूद कायद्यात नसल्याचे राज्य निवडणूक आयोगातील सूत्रांनी सांगितले.

'नोटा' चा पर्याय हा उमेदवार नसून, निवडणूक झाल्यास निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांना नाकारण्याचा पर्याय असल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. सध्या बीएमसी निवडणूक सह राज्यभर महापालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांचीच चर्चा आहे. त्यावरून राज्य निवडणूक आयोगाला लक्ष्य करण्यात येत आहे. आयोगाकडून या प्रक्रियेत हस्तक्षेप करावा, अशीही मागणी करण्यात येत आहे.

# काँग्रेसचे दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्याबाबत भाजप प्रदेशाध्यक्षांचे वादग्रस्त विधान

प्रतिनिधी ६ जानेवारी

**लातूर** : महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्याबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी वादग्रस्त विधान केले आहे. महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचारासाठी रविंद्र चव्हाण हे लातूरमध्ये आले होते. यावेळी बोलताना त्यांनी शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील असं विधान केले. यावर आता अभिनेता रितेश देशमुखने उत्तर दिले आहे. 'दोन्ही हात वर करुन सांगतो, लोकांसाठी जगलेल्या माणसांची नावे मनावर कोरलेली असतात. लिहलेलं पुसता येतं, कोरलेलं नाही, जय महाराष्ट्र!' असं रितेश देशमुखने म्हटलं आहे. रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या वक्तव्यावरुन काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. रवींद्र चव्हाण यांनी केलेलं वक्तव्य दुर्दैव आहे. लातूरची ही संस्कृती नाही ही महाराष्ट्राची संस्कृती नाही त्याचा मी निषेध व्यक्त करतो आणि त्याचा निषेध सर्वत्र होत आहे, असं ते म्हणाले. तसेच लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पायाखालची वाळू घसरत असल्याने आणि जनतेचा पाठिंबा कमी होत चालल्याने केवळ सहानुभूती मिळवण्यासाठी हा मुद्दा उकरून काढला जात आहे, अशी टीका भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी 7 फेब्रुवारी रोजी मतदान होण्याची शक्यता!

## ◆ ३२ जिल्हा परिषद आणि ३३६ पंचायत समित्यांचा समावेश

प्रतिनिधी ६ जानेवारी

**मुंबई** : राज्यामध्ये सध्या २९ महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकीसाठी मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. ही निवडणूक पार पडताच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचा धुरळा उडणार आहे. याच आठवड्यामध्ये दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या निवडणुकांसाठी पुढच्या महिन्यात ७ फेब्रुवारी रोजी मतदान होण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून ७ जानेवारी रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्यामधील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होणार आहे. यामधील १७ जिल्हा परिषद आणि ८८ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्यामुळे आरक्षणाच्या मर्यादेमध्ये असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. याची तयारी राज्य निवडणूक आयोगाकाकडून केली जात आहे.

सुप्रीम कोर्टाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यात याव्यात असे आदेश दिले होते. पण आरक्षणाच्या पेचामुळे जिल्हा परिषद निवडणुकीवर परिणाम झाला आहे. या आरक्षणामुळेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यास उशिर होत आहे. पण आता या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. ७ फेब्रुवारी रोजी यासाठी मतदान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बुलढाणाच्या तीन मित्रांना बसने चिरडले!

प्रतिनिधी ६ जानेवारी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगरकडून धाडकडे जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसखाली चिरडल्या गेल्याने तिघा मित्रांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हे तिघेही बुलढाणा जिल्ह्यातील ढालसांगवी येथील आहेत. दुर्दैवी घटना सोमवारी (ता. ५) रोजी सायंकाळी चार वाजून ५० मिनिटांनी धाड- छत्रपती संभाजीनगर मार्गावरील करडीच्या (धाड) पुलावर घडली. पोलिसांकडून प्राप्त माहिती नुसार, मलकापूर आगाराची बस (क्रमांक एमएच-०६-बीडब्ल्यू-३६३८ क्रमांकाची एसटी बस सोमवारी ५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून मलकापूरला येत होती. यावेळी बसवर चालक म्हणून गजानन जुमळे रा.मलकापूर हा होता. तर बुलडाणा तालुक्यातील ढालसावंगी येथील अंकुश पाडळे, रवी चंदनशे आणि कैलास शिंदे हे तिघे एकाच मोटारसायकलवर स्वार होऊन धाडवरून कराडीच्या दिशेने जात होते.दरम्यान सदर बस सायंकाळी ४.५० मिनिटांनी करडी (धाड) येथील पुलावर येताच या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक एवढी जोरदार होती की, त्यानंतर दुचाकीचा चुरा होऊन बसखाली घुसली. यामध्ये तिन्ही दुचाकीस्वारांना गंभीर मार लागून त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# परमनंट व्हायचंय तर ही मोठी अट पाळा, अन्यथा शर्यतीतून बाहेर!

## अग्निवीरांबाबत सैन्यदलाचा महत्वाचा निर्णय

प्रतिनिधी ६ जानेवारी

**नवी दिल्ली** : भारतीय सैन्याच्या अग्निवीर योजनसंदर्भात सरकारकडून एक महत्वाची माहीती समोर आली आहे. साल २०२२ मध्ये सुरु झालेल्या या योजनेची पहिली बॅच आता चार वर्षांची सेवा पूर्ण करणार आहे.अशात हजारो अग्निवीरांच्या भविष्या संदर्भात प्रश्न निर्माण झाले असताना आता भारतीय सैन्याने नियम जारी करीत याचे उत्तर दिले आहेत.

भारतीय सैन्याने स्पष्ट केले की जर पर्मानंट सैनिक व्हायचे असेल तर प्रक्रीयेत शिस्त आणि नियमांचे पालन करणे सर्वाधिक गरजेचे असणार आहे.




मिळालेल्या माहितीनुसार जून आणि जुलै महिन्यात २० हजाराहून जास्त अग्निवीरांना त्यांच्या चार वर्षांच्या सेवापूर्तीनंतर त्यांना डिस्चार्ज केले जाणार आहे. यात सुमारे २५ टक्के अग्निवीरांना त्यांच्या चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन, लेखी परीक्षा आणि शारीरिक क्षमतेआधारे कायम सैनिक म्हणून पुन्हा सैन्यात रुजू करण्याची संधी मिळणार आहे.

परमानंट होण्यासंदर्भात सैन्याने लग्ना संदर्भात नियमांना स्पष्ट केले आहे. भारतीय सैन्य दलाच्या मते अग्निवीर आपल्या चार वर्षांच्या कार्यकाळादरम्यान लग्न करु शकणार नाहीत. डिस्चार्ज झाल्यानंतर लागलीच लग्नाची परवानगी दिली जाणार नाही. जोपर्यंत परमानंट सैनिक बनण्याची निवड प्रक्रीया पूर्ण समाप्त होत नाही आणि अंतिम परिणाम घोषीत केले जात नाहीत तोपर्यंत अग्निवीरांना अविवाहित राहावे लागणार आहे.

### नियम तोडला तर परमानंट नोकरी जाणार

सैन्य दलाने स्पष्ट केले आहे की जर कोणा अग्निवीराने या नियमांचे उल्लंघन करीत या काळात लग्न केले तर त्यास परमानंट सैनिक पदासाठी अयोग्य घोषीत केले जाईल.असे उमेदवार निवड प्रक्रीयेच्या बाहेर जातील, मग भले त्यांचे प्रदर्शन कितीही चांगले असेल.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरण; आरोपीची जामीनावर सुटका

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अमरावती :** पोलीस स्टेशन नंदगांव पेठ येथे १/११/२०२५ रोज़ी पीड़ितने तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे नमूद होते. आरोपी याने पीड़ित हिला लग्न करण्याचे आमीश दाखवून तिच्या सोबत वारंवार शारीरीक संबंध केले त्यामुळे ती गर्भवती झाली तरी त्याचेवर योग्य ती कार्यवाही ३ म्हणून अरोपी विरुद्ध कलम ६४(२)(म) भारतीय न्याय संहिता व कलम ४ अनि ६ पॉक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला व आरोपीची अटक करुण प्रकरणाचा तपास सुरु केला. त्या दरम्यान आरोपीने ॲड. सपना जाधव ह्यांच्या मार्फ़त विद्यमान विशेष जिल्हा न्यायालय अमरावती येथे जमानत चे अर्ज सादर केला. दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून विशेष जिल्हा न्यायालय अमरावती यानी दी १८/१२/२०२५ रोज़ी आरोपिस जमानत मंजूर केली.

# माई सिंधुताई सपकाळ माझ्यासाठी आदर्श होत्या

**◆माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांचे प्रतिपादन ◆सावित्रीबाई फुले जयंती व सिंधुताई सपकाळ पुण्यतिथीनिमित्त चिखलदऱ्यात करुणेचा जागर**

प्रतिनिधी ६ जानेवारी

**चिखलदरा, :** सिंधुताई माझ्यासाठी केवळ समाजसेविका नव्हत्या, त्या माझ्या आयुष्याचा आदर्श होत्या. समाजातील निराधार लेकरांसाठी त्यांनी स्वतःचे आयुष्य झिजवले. त्यांच्या डोळ्यांत माणुसकी होती आणि हृदयात अमाप करुणा होती. त्या आज नाहीत, पण त्यांच्या विचारांनी मला आजही काम करायला भाग पाडले आहे.ङ्ग ङ्गमाई ज्या भावनेतून मेळघाटात आल्या, ज्या दुर्गम भागातून त्यांनी सामाजिक कार्य सुरू केले, ती ठिणगी आज मोठ्या ज्वालासारखी पेटलेली आहे. माईंचे स्वप्न अपूर्ण राहू देणार नाही, हीच आजची खरी श्रद्धांजली आहे,ङ्ग असे माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांनी ठाम शब्दांत सांगितले. मार्गदर्शन करताना डॉ. कमलताई




रामकृष्ण गवई यांचा स्वरही भावनांनी भरून आला.

माईंच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त आणि सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून, पद्मश्री सौ. सिंधुताई सपकाळ जनविकास सामाजिक बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे शाखा चिखलदरा यांच्या वतीने आयोजित पुष्पांजली कार्यक्रम हा केवळ कार्यक्रम नव्हता, तर माईंच्या आठवणींनी भरलेला एक भावनिक प्रवास ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री व माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई रामकृष्ण गवई होत्या. सावित्रीबाई फुले आणि सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताच संपूर्ण सभागृह क्षणभर स्तब्ध झाले. जणू माई स्वतः तिथे उपस्थित असल्याचा भास उपस्थितांना होत होता. त्या बोलतांना पुढे म्हणाल्या की, 'चिखलदरा ही माईंची कर्मभूमी. इथूनच त्यांनी आदिवासी मुलींसाठी पहिली आश्रमशाळा सुरू केली. जिथे शिक्षणाचा प्रकाश कधी पोहोचलाच नव्हता, तिथे माईंनी आशेचा दिवा लावला. आजही त्या शाळेतून शिकणाऱ्या मुली माईंच्या स्वप्नाची साक्ष देत आहेत. यावेळी माईंचे चिरंजीव अरुणभाऊ सपकाळ यांनी भावूक होत सांगितले, ङ्गआई शारीरिक स्वरूपात आज आमच्यात नाही, पण तिचे कार्य पुढे नेणे हीच माझी जबाबदारी आहे. श्वासाच्या शेवटच्या क्षणापर्यंत आईचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन.ङ्ग या कार्यक्रमात जिल्हा सत्र न्यायाधीश प्रभाकर मोडक, माजी आयकर आयुक्त पियुष कोल्हे, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी माईंच्या मातृत्व, संघर्ष आणि समाजसेवेवर मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार केवलराम काळे, नागपूरचे माजी आ. प्रभूदास भिलावेकर, गुगामल राष्ट्रीय उद्यानाच्या उपवनसंरक्षक कीर्ती जमदाडे-कोकाटे, वॉरंट ऑफिसर एअर फोर्स सुनील मानकर, नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर, अभिमान डोईजड, धर्मराज खडके, राजू करंडे, मार्तंड नेवासकर, जेष्ठ पत्रकार मोहम्मद अश्रफभाई, अधीक्षिका सरिता सपकाळ, प्रसाद सपकाळ, सौ. जान्हवी सपकाळ यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.दोन दिवसीय कार्यक्रमात वक्तृत्व, कविता वाचन, गीत गायन, अनुभव कथन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने हेलावून टाकली. सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणातील योगदान आणि सिंधुताईंच्या संघर्षमय आयुष्याचा संदेश प्रत्येक मनात खोलवर रुजला.

**चिखलदरातून सिंधुताईंच्या विचारांचा अखंड प्रवास सुरूच...**

माई गेल्या, पण माईंची माया अजून जिवंत आहे, चिखलदरातून सिंधुताईंच्या विचारांचा अखंड प्रवास सुरूच आहे. माई सिंधुताई सपकाळ आज हयात नाहीत, पण ज्या हातांनी त्यांनी अनाथांना मायेची ऊब दिली, ती ऊब आजही जिवंत आहे. माई गेल्या नाहीत, त्या हजारो लेकरांच्या हसण्यात, शिक्षणात आणि माणुसकीत आजही जिवंत आहेत. त्यांचे कार्य चालू आहे आणि तेच समाजासाठी आशेचे खरे दालन आहे, अशी भावना या कार्यक्रमात उमटली. काळाच्या पडद्याआड गेलेली एक माणुसकी आजही जिवंत आहे. आई नसतानाही हजारो लेकरांना मायेसारखी कवेत घेणारी पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ (माई) आज हयात नाहीत. पण ज्या हातांनी त्यांनी अनाथांच्या अश्रूंना पुसले, त्या हातांचे कार्य आजही थांबलेले नाही. माईंचे शरीर नाही, पण त्यांची माया, त्यांचे विचार आणि त्यांचे स्वप्न आजही चिखलदरातून समाजाच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचत आहे.

## जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

# समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजनेची अंमलबजावणी सुरू

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अमरावती :** जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या दळणवळणाची समस्या सोडविण्यासाठी आणि पाणी साठा वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संपूर्ण जिल्ह्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समृद्धी शेत पांदन रस्ते व जल पुनर्भरण योजना' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये बारामाही शेत रस्ते तयार करण्यात येणार असून, यासाठी स्थानिक नदी व नाल्यांमधील गाळ व साहित्याचा वापर केला जाणार आहे, यामुळे जलस्त्रोतांचे खोलीकरण होऊन पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

योजना लोकसहभाग आणि शासकीय निधीच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाणार आहे. योजनेसाठी प्रति किलोमीटर ९ लाख रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला असून, त्यापैकी ७.५ लाख रुपये शासन देणार आहे, तर उर्वरित १.५ लाख रुपये संबंधित अशासकीय संस्थेला लोकसहभागातून उभे करावे लागणार आहेत. या कामासाठी रस्ते बांधणीचा अनुभव असलेल्या सेवाभावी संस्थांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. निवड झालेल्या संस्थांसोबत जिल्हाधिकारी कार्यालय सामंजस्य करार करणार आहे. या योजनेमुळे शेत रस्त्यांवरील अतिक्रमणे दूर होऊन शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेपर्यंत नेणे अधिक सुलभ होईल, असे उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी कळविले आहे.

# आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अमरावती :** आदिवासी विकास विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा सन २०२५-२६ चा उद्घाटन सोहळा आज संपन्न झाला. या स्पर्धेचे उद्घाटन राज्य माहिती आयोग आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडाध्वजाचे ध्वजारोहण करुन क्रीडाज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली.

आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह, नाशिकचे अपर आयुक्त दिनकर पावरा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमित रंजन, झेनिच चंद्र दोनथुला, सिद्धार्थ शुकना तसेच विविध विभागांचे अधिकारी,



कर्मचारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आदिवासी कला व संस्कृतीचे दर्शन घडविणारी भव्य हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या दालनांमध्ये अमरावती विभागातील धारणी, अकोला, पुसद, कळमनुरी, किनवट तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, धारणी यांनी सहभाग नोंदविला. याशिवाय नागपूर विभागातील देवरी प्रकल्पातील चिमुकल्यांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. या हस्तकला दालनांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन समारोपाच्या कार्यक्रमात अमरावती विभाग विरुद्ध नाशिक विभाग यांच्यातील हॉलीबॉल सामना अत्यंत चुरशीचा झाला. पहिल्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने २० गुण मिळविले. दुसऱ्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने १८ गुण प्राप्त केले. उत्कृष्ट सांघिक खेळ व दमदार कामगिरीच्या जोरावर अमरावती विभागाचा संघ विजयी ठरला. संपूर्ण कार्यक्रमातून आदिवासी विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्य, सांघिक भावना, शिस्त तसेच आदिवासी हस्तकलेचा समृद्ध वारसा अधोरेखित झाला.

# अमरावती शहर गुन्हेशाखे कडुन चोरीतील १२ मोटार सायकलसह आरोपी अटक

प्रतिनिधी ६ जानेवारी



**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील वाहन चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकिस आणने बाबत आदेशीत केले वरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली.

पोलीस आयुक्तालय हद्दीत पो. स्टॉफसह रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगार चेकिंग करीता पेट्रोलींग करीत असतांना ०५/०१/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, पो.स्टे. सिटी कोतवाली अपराध क्रमांक ०९/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. मधील चोरीस गेलेली मोटार सायकल एक इसम हा गांधी चौक येथे मोटार सायकल विक्री करण्याचे उद्देशाने उभा आहे. अशा माहीती वरून एक इसम हा होन्डा कंपनीच्या स्प्लेडंर वाहनावर संशयरित्या उभा दिसला. आम्ही, पो. स्टाफचे मदतीने घेराव घालुन त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गाव निरंजन पंजाबराव कळसकर वय ३५ वर्ष रा. भटवाडी. अमरावती असे सांगितले. त्याचे ताब्यातील वाहनाबाबत विचारपुस केली असता त्याने उडवा-उडविचे उत्तरे दिले. सदर इसम हा मोटारसायकल चोरी करणारा रेकॉर्ड वरील अट्टल आरोपी असल्याने त्यास बारकाईने विचारपुस केली असता त्याने सदरचे वाहन हे २ दिवसापुर्वी शाम चौक रघुवीर मिठाई समोरून चोरी केली असल्याचे तसेच शहरातील इतर चोरीच्या मोटार सायकली बाबत विचारपुस केली असता. त्यांने कबुली दिल्यावरून त्यास सदर गुन्हयात अटक करून त्याचे ताब्यातुन नमुद गुन्हयातील मोटार सायकल व इतर गुन्हयातील मोटार सायकली जप्त करण्यात आले त्याचे वर्णन खालील प्रमाणे नमुद आरोपी निरंजन पंजाबराव कळसकर वय ३५ वर्ष रा. भटवाडी. अमरावती याचे ताब्यातुन वरील प्रमाणे एकुण १२ मोटार सायकली चे कि.अं. ४,३५,०००/- रू चा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच सर्व वाहने पो.स्टे. सिटी कोतवाली येथे जमा करण्यात आले आहे. या व्यतीरीक्त तपासा मध्ये नमुद आरोपीकडुन अजुन काही गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता आहे.

सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात, सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार - गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, विकास गुळधे, नईम बेग, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, प्रभात पोकळे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# गुन्हे शाखा यांच्याकडुन दुचाकी चोरट्यास दोन दुचाकीसह अटक

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अमरावती :** पोलीस आयुक्त राकेश ओला शहर यांनी आयुक्तालय हददीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणेबाबत आदेशीत केल्यावरुन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

०३/०१/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहीती मिळाली की एक इसम हा समाधान नगर रोडवर बसस्टँड जवळ चोरीची गाडी घेवुन उभा आहे यावरुन आरोपी नामे मोहम्मद मुदस्सीर उर्फ जकी मोहम्मद युनुस, वय २७ वर्ष, रा. ग्रीन पार्क, वलगांव रोड अमरावती यास ताब्यात घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस




केली असता त्याने कबुली दिली की अंदाजे एक वर्षापुर्वी रेल्वे स्टेशन चौकातुन ३५० सी सी लाल काळया रंगाची विनानंबर प्लेट असलेली बुलेट चोरी केल्याची तसेच भुसावळ वरुन एक काळया रंगाची विनानंबर प्लेट ची हिरो होंडा स्प्लेंडर दोन वर्षापुर्वी चोरी केल्याची कबुली दिली वरुन त्याचे ताब्यातुन दोन मोटारसायकल जप्त करून मोटारसायकल चोरीबाबत पोलीस स्टेशन कोतवाली येथील अप क ५२२/२०२५ कलम ३०५ ब बीएनएस प्रमाणे दाखल असलेला गुन्हा उघडकिस आणला व पुढील कायदेशीर कार्यवाही करीता आरोपीस पोस्टे कोतवाली यांच्या ताब्यात देण्यात आले.

आरोपीचे : मोहम्मद मुदस्सीर उर्फ जकी मोहम्मद युनुस, वय २७ वर्ष, रा. ग्रीन पार्क, वलगांव रोड अमरावती असे नाव आहे. सदर ची कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ साहेब, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार - पोहेकॉ दिपक सुंदरकर, जहीर, सचीन बहाळे, छोटेलाल यादव, नापोका अतुल संभे, पोकों सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, निखील गेडाम, सागर ठाकरे, निलेश वंजारी यांनी केली आहे.



# रेशनविषयी नागरिकांच्या समस्या निकाली काढा अन्यथा आमरण उपोषण, गणेशभाऊ चौकसे यांचा इशारा

प्रतिनिधी ६ जानेवारी

**खामगाव :** खामगाव शहर हे तालुक्यातील सर्वात मोठे शहर आहे मात्र तहसील विभागातील रेशन कार्ड विभागाला मागील दोन वर्षापासून कायमस्वरूपी पुरवठा अधिकारी नसल्यामुळे रेशन कार्ड धारकांना विविध समस्याचे सामोरे जायला लागत आहे. त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास रोखण्यासाठी कायमस्वरूपी अधिकारी द्यावा अन्यथा तहसील कार्यालयासमोर राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी दिला आहे. खामगाव तहसील कार्यालय अंतर्गत येणाऱ्या पुरवठा विभागाच्या चुकीमुळे जिल्ह्यातील अनेक राशन धारकांचे आरसी नंबर नाशिक विभागात ट्रान्सफर झाले आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांचे तसेच नागरिकांना अनेक अडचणीला सामोरे जायला लागत आहे. नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे लिखित अर्ज



करून सुद्धा या समस्येचे योग्य समाधान केले जात नाही व नागरिकांना वारंवार आधार कार्ड, रेशन कार्ड यांची झेरॉक्स, दहा रुपयाची तिकीट लावून वेळोवेळी अर्ज करा असे सांगण्यात येत आहे. नागरिकांच्या या बिकट समस्येकडे मागील दोन वर्षात कोणत्याही प्रकारची ठोस भूमिका घेऊन निकाली काढण्यात आली नाही. तसे पाहता सदर विभागाने जर नाशिक विभागाचे समन्वय राखून योग्य पत्र व्यवहार केला असता तर आतापर्यंत ही समस्या मार्गी लागली असती. शासन मस्त व नागरिक त्रस्त असे म्हणणे वावे ठरणार नाही.राष्ट्रीय ओबीसी महासंघावर च्या वतीने निवेदनात नमूद केले की ,बुलढाणा जिल्ह्यातील राशन धारकांचे आरसी नंबर नाशिक विभागात योग्य ते पत्र व्यवहार करून त्वरित बुलढाणा जिल्ह्यात हस्तांतरित करण्यात यावी. जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन अन्नसुरक्षा निष्ठांक त्वरित वाढवण्यात यावा व लाभार्थ्यांना अन्नसुरक्षित समाविष्ट करून घेण्यात यावे.अपंग बांधवांना अंत्योदय योजनेचे कार्डचे वितरण करण्यात यावे.कायमस्वरूपी पुरवठा अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी असे न केल्यास पंधरा दिवसानंतर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण, व तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल व त्यानंतर उद्भवणाऱ्या संपूर्ण परिस्थितीला शासन व प्रशासन जबाबदार राहील असेही राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांनी निवेदनात नमूद केले आहे. याच्याप्रती छगन भुजबळ अन्नपुरवठा विभाग महाराष्ट्र शासन मुंबई, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन,उपमुख्यमंत्री अजित पवार महाराष्ट्र शासन मुंबई उपमुख्यमंत्री, एकनाथजी शिंदे महाराष्ट्र शासन मुंबई डॉ मा बबनरावजी तायडे साहेब राष्ट्रीय ओबीसी महासंघ राष्ट्रीय अध्यक्ष नागपूर पोलीस अधीक्षक साहेब बुलढाणा, जिल्हाधिकारी साहेब बुलढाणा मकरंद पाटील साहेब पालकमंत्री बुलढाणा अन्नपुरवठा पुरवठा निरीक्षक साहेब बुलढाणा एसडीओसाहेब खामगावशहर पोलीस स्टेशन ला दिली आहे.

# नांदुरा - जळगाव जामोद रोडवर काळी पिवळी उलटून १३ प्रवासी जखमी

प्रतिनिधी ६ जानेवारी

**खामगाव :** अवैध प्रवासी घेऊन जळगाव जामोद येथुन नांदुऱ्याला येणारी काळी पिवळी पलटी होऊन झालेल्या अपघातात गाडीतील १३ प्रवासी गंभीर जखमी झाले. ही घटना निमगाव फाट्याजवळ आज सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घडली. जखमीतील काही जणांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी खामगाव येथे हलविण्यात आल्याची माहिती मिळाली.

या बाबत प्राप्त माहितीनुसार , एम एच २८ एम ३०८६ या क्रमांकाची काळी पिवळी प्रवासी घेऊन जळगाव जामोद येथुन नांदुऱ्याला येत होती. दरम्यान निमगाव फाट्याजवळ या गाडीच्या चालकाचे स्टेअरिंग वरील नियंत्रण सुटल्याने गाडी पलटी होऊन रोडच्या कडेला असलेल्या खड्डयात गेली. त्यामुळे या अपघातात गाडीतील प्रणाली महेंद्र वानखडे वय १७ रा अकोली ता जळगांव जामोद , शाहीस्ता महमुद खान वय २० रा . सुरत , फरीदा महमुद खान वय ४० रा. सुरत , अमान महमुद खान वय १० रा . सुरत , अक्षरा संतोष तेलंग वय ७ रा. पी.राजा , अन्नपूर्णा संतोष तेलंग वय ३८ रा. पींपळगाव राजा , अंजना अशोक तायडे वय ६७ रा. नांदुरा , संतोष रुस्तम तेलंग वय ४५ रा . पींपळगाव राजा , अशोक निनाजी तायडे वय ७२ रा. नांदुरा शबनम पठाण महमुद पठाण वय २० रा . सुरत, महमुद खान बिस्मिल्लाह खान वय ५३ रा. सुरत, भुसरा खान महमुद खान वय १६ रा. सुरत आणि शाहीन जाकीर देशमुख वय २४ रा . सुरत हे १३ प्रवासी या अपघातात जखमी झाले. जखमींना तातडीने नांदुरा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले. यातील काही प्रवास्यांची परीस्थिती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी खामगाव येथे हलविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## नरनाळा महोत्सवामुळे पर्यटनाला मिळणार चालना

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला:** सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान घेण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे. या महोत्सवामुळे पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वास वनपर्यटनप्रेमी, कलावंत, अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्याच्या उत्तरेला शहानूर या छोट्याश्या गावाला लागून सातपुड्याच्या डोंगरात असलेला नरनाळा किल्ला आहे. या ऐतिहासिक किल्ल्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी महोत्सव आयोजनाची संकल्पना पुढे आली.



## कापशी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला:** कापशी येथे नुकतेच मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. येथील ओम क्लिनिक'च्या २४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून गरजू रुग्ण आणि नागरिकांसाठी हे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे आयोजक डॉ.प्रशांत सांगळे व डॉ. नलिनी सांगळे यांनी साकार केलेल्या या उपक्रमात ग्रामीण भागातील रुग्णांना एकाच छताखाली विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी आणि सल्ला मिळावा, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# मनब्दा येथे वन्यप्राण्यांचा धुमाकूळ; ८ एकर हरभरा फस्त, शेतकरी हवालदिल

प्रतिनिधी ६ जानेवारी

**तेल्हारा:** येथील शेतकरी ज्ञानेश्वर गोपाल पाथ्रीकर यांच्या शेतात वन्यप्राण्यांनी मोठ्या प्रमाणात धुडगूस घालून जवळपास ८ एकर क्षेत्रातील हरभरा पिकाचे अतोनात नुकसान केले आहे. हातातोंडाशी आलेला घास वन्यप्राण्यांनी हिरावून घेतल्यामुळे शेतकरी आता संकटात सापडला असून, वनविभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी आपल्या ८ एकर शेतात मोठ्या कष्टाने हरभऱ्याची पेरणी केली होती. पीक सध्या बहरात असून लवकरच काढणीला येणार होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिसरात रानडुकरे आणि हरिणांच्या कळपांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या सुमारास या वन्यप्राण्यांनी शेतात शिरून पिकाची मोठ्या प्रमाणावर नासधूस केली. झाडे उपटून टाकणे आणि पीक तुडवल्यामुळे उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यता आहे. मशागत, बियाणे, खते आणि औषध फवारणीसाठी आतापर्यंत हजारो रुपये खर्च झाले आहेत. पीक चांगले आल्याने कर्जाची परतफेड होईल अशी आशा होती, मात्र वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे ही आशा धुळीस मिळाली आहे. 'आम्ही रात्रंदिवस मेहनत करतो आणि एका रात्रीत वन्यप्राणी सर्व उद्ध्वस्त करतात, अशा परिस्थितीत आम्ही जगायचे कसे?' असा आर्त सवाल हवालदिल झालेल्या पाथ्रीकर यांनी उपस्थित केला आहे.



**वनविभागाच्या भूमिकेकडे लक्ष**

या भागात वन्यप्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकरी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पिकांचे रक्षण करत आहेत. मात्र, आता हे नुकसान आवाक्याबाहेर गेले आहे. वनविभागाने तात्काळ या भागाची पाहणी करून पिकाचा पंचनामा करावा आणि नियमानुसार नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी मागणी आहे.

## शौर्य दिनानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न



प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोट:** जळगाव नहाटे येथे १ जानेवारी शौर्य दिन भीमा कोरेगाव निमित्त सम्यक दृष्टी सेवाभावी बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या पुढाकाराने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शूरवीरांच्या स्मृतीला स्मरून उपक्रम राबवला. उद्घाटन पोलिस निरीक्षक, रूपालीताई काकडे, गोपाल मोहोड, महेश गणगणे, कुलदीप वसु व शरद नहाटे सरपंच जळगाव यांच्या उपस्थितीत करण्यात आले.प्रमुख उपस्थिती राधेश्याम ओहेकर लोतखेड सरपंच, राजेश वानखडे, चरण इंगळे, लखन इंगळे, आशिष रायबोले, विक्की तेलगोटे, राजू रावनकार, प्रदीप नहाटे,अजय पवार, ग्रामपंचायत शिवशंकर कोळसकर ग्रामसेवक, गजानन खलोकार उपसरपंच, पो.पा.प्रमोद नहाटे, निलेश नहाटे,नितिन हिंगणकर, सुधाकर घोपे ,पवन ठाकूर मुक्यध्यापक , मंगला वानखेडे उपस्थित होत्या. दीप प्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, यांच्या प्रतिमेचे पूजन फुल पुष्पहार वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रक्तदान शिबिरामध्ये महिला व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## दिव्यांग प्रेरणा पुरस्कारासाठी अर्ज मागविले

**अकोला:** जिल्हास्तरीय दिव्यांग प्रेरणा पुरस्कारासाठी १४ जानेवारीपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. दिव्यांग व्यक्ती कार्यकर्ता, तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणारी संस्था यांना स्वतंत्रपणे जिल्हास्तरीय पुरस्कार दिला जाईल. पात्र व्यक्ती व संस्थांनी दि. १४ जानेवारीस सायं. ५ पर्यंत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलीस वसाहतीच्या बाजूला, अकोला येथे अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले आहे.

## शेतकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने शेतातच मृत्यू

◆ पिंपळडोळी शेतशिवारातील घटना

प्रतिनिधी ६ जानेवारी

**आलेगाव:** पातूर तालुक्यातील पिंपळडोळी येथील शेतकरी सैय्यद मेहबूब पत्नी सह शेतशिवारात तूरपीकाच्या राखवाली करीत असताना त्यांचा हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी मृत्यू होण्याची घटना पिंपळडोळी शेतशिवारात दिनांक ५ रोजी रात्री घडली त्यामुळे परिसरात हळ हळ व्यक्त होत आहे.

पिंपळडोळी येथील अल्पभूधारक शेतकरी सैयद मेहबूब सैय्यद रसूल वय वर्षे ६५ आपल्या शेतातील तूर पिकांचे वन्यप्राण्यांपासून संरक्षण व्हावे या अनुषंगाने गेल्या काही दिवसांपासून तुरीच्या रखवाली करीता रात्रीचे वेळेस शेतात पत्नीसह जायचे,असेच दिनांक ५ रोजी पत्नीसह रात्रीचे वेळेस रखवाली निमित्त गेलेले असताना त्यांच्या छातीमध्ये कळ आली, आणि त्यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने जागेवरच मृत्यू झाला.पतीच्या जीवाचा आकांत पाहून पत्नी रोसतबी ह्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने पतीला खासगी डॉक्टर कडे आणले असता डॉक्टरांनी हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे मृत्यू झाल्याचे सांगितले.ही घटना शेतकऱ्यांच्या कस्टमय जीवनाचे वास्तव पुन्हा एकदा अधोरेखित करणारे ठरले.दिवसरात्र शेतात मेहनत करणारा शेतकरी अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो, हे या घटनेतून प्रकर्षाने समोर आले आहे. कस्ट, ताणतणाव व अनियमित जीवनशैली यामुळे, शेतकऱ्याच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला चालल्याचे चित्र या घटनेमुळे समोर आले आहे.

## ग्रामीण पत्रकारांना मिळणार संगणक प्रशिक्षण




प्रतिनिधी ६ जानेवारी

**हिवरखेड:** 'पत्रकार समाजाचा आरसा असतात, त्यांना तंत्रज्ञानाने सक्षम करणे हीच लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची खरी सेवा आहे.' असे प्रतिपादन डॉ. मयूर लहाने यांनी केले. आकांक्षा कॉलेज ऑफ पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट येथे पत्रकार दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ग्रामीण भागातील पत्रकारांना आधुनिक युगाशी जोडण्यासाठी संस्थेच्या वतीने विशेष संगणक साक्षरता प्रशिक्षण देण्याची घोषणा करण्यात आली. संस्थेचे संस्थापक स्व. बंडू उपाख्य बाळासाहेब लहाने यांच्या स्मृती प्रित्यर्थ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . ग्रामीण भागातील पत्रकार बंधूंना तंत्रज्ञानाचे बळ मिळावे या उद्देशाने ग्राफिक्स डिझायनिंग आणि डीटीपी प्रशिक्षण दिले जाणार आहे. परिसरातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. त्यात प्रामुख्याने धीरज बजाज, सतीश इंगळे, अर्जुन खिरोडकार, जमीरोद्दीन, गजानन राठोड, गणेश सुरजोशी, जितेश कारिया, मनोज भगत, प्रशांत भोपळे, रितेश टीलावत, बलराज गावंडे, जितेंद्र लाखोटीया, केशवजी कोरडे, प्रेस क्लब, आदर्श पत्रकार संघ, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, इत्यादी सर्वच संघटनाच्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ज्येष्ठ पत्रकार केशव कोरडे तर आभार डॉ. मयूर लहाने यांनी मानले.

## राज्यात ३६ हजार उद्योजक निर्माण करणार : रविंद्र माणगावे

प्रतिनिधी ६ जानेवारी

**मूर्तिजापूर :** 'गाव तिथे उद्योजक' या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत गावागावात उद्योग निर्माण करण्याचा संकल्प महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अ‍ॅग्रीकल्चरचे रविंद्र माणगावे यांनी जाहीर केला. ते म्हणाले, कॉमर्स आणि इंडस्ट्रीज आता बऱ्यापैकी सक्षम झाल्या आहेत, त्यामुळे आता आम्ही उपेक्षित वर्गाकडे मोर्चा वळवला आसून त्यासाठी राज्यभरातील गावागावात जाऊन ३६ जिल्ह्यात ३६ हजार युवा उद्योजक उभे करणार. त्यासाठी सर्त मोठी अडचण भांडवल आणि बाजारपेठेची आसते त्यावर आम्ही काम करणार आणि त्यासाठी जिल्हानिहाय समन्वय समित्या गठीत करणार असल्याचे त्यांनी नमुद केले. प्रत्येक गावात किमान एक उद्योग उभारणे व जॉब वर्क देणारी यंत्रणा उभारणे, सुपर स्टॉकीस्ट, स्टॉकीस्ट निर्माण करणे यावर आम्ही काम करणार असल्याचेही ते म्हणाले. मुर्तीजापुर तालुक्यात मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय निर्माण व्हावा या उद्देशाने अविन अग्रवाल यांनी बैठक घेतली. सचिव सुरेश घोरपडे, कैलास खंडेलवाल, सदस्य सी. पी. ठक्कर व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन अ‍ॅड. अविन यांनी स्वागत केले. रिंकू अरोरा, इब्राहिम घाणीवाला, जय किशन दज्जूका, जतिन हरिया,प्रवीण वर्मा,अशोक भावनानी,आनंद बांगड़, नवीन अग्रवाल, कार्तिक सोमानी, निरखे गजानन अग्रवाल, नवीन अग्रवाल, सचिन अग्रवाल, पंकज निमोदिया, अनूप अग्रवाल, अशोक बठेजा, विनायक वारे, गुड्डू ठाकुर,अनिल मेघानी,योगेश देवड़ा उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार चंदन अग्रवाल यांनी केले



## निधन वार्ता

**अनिलपंत हाडोळे**



**अकोट:** मुंडगाव येथील प्रतिष्ठित नागरिक सतीश हाडोळे यांचे वडील अनिलपंत पुंडलिकराव हाडोळे (८१) यांचे सोमवारी वृद्धपकाळाने निधन झाले. ते महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष होते, त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली असा आप्तपरिवार आहे.

# जि.प.शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

प्रतिनिधी ६ जानेवारी

**कुटासा:** ०३ जानेवारी ते १२ जानेवारी पर्यंत सावित्री -जिजाऊ जन्मोत्सव, लेक वाचवा, लेक शिकवा अभियान, 'ज्ञानोत्सव' चे आयोजन करण्यात आले होते. त्याची सुरुवात सावित्री आई फुले यांची जयंती व बालिका दिन साजरा करत करण्यात आला त्यानिमित्ताने 'वेशभूषा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते चवथीच्या विद्यार्थ्यांनी छान वेशभूषा करत महापुरुषांना सादर करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-३ च्या मूल्यांकन करिता आलेले अरिफ व महल्ले यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमासाठी पो. पाटील गजानन उगले, शा. व्य स अध्यक्षा सौ. रामदुलारी केवट, उच्च श्रेणी मु.अ. मधुकर बल्ले, देवेंद्र फोकमारे, रामदास केवट, राजू भोरे, उमेश थोटे अंगणवाडी सेविका, मदतनीस, सर्व शिक्षक शिक्षिका, गावकरी मंडळी उपस्थित होते. वेशभूषा स्पर्धेचे परीक्षण सौ पागृत व सौ. कुलकर्णी यांनी केले.स्पर्धेच्या आयोजना करिता सौ भांडे, सौ. सित्रे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रकाश पानझाडे यांनी केले.



## रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेमुळे मावळत्या वर्षात गुन्ह्यात घट

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला:** रेल्वे स्टेशन हे मध्य रेल्वे व दक्षिण मध्य रेल्वे मार्गावरील एक महत्वाचे रेल्वे जंक्शन आहे. अकोला रेल्वे स्टेशन येथून जवळपास १४० रेल्वे धावत असून दररोजची प्रवाशी संख्या २८ ते ३० हजार आहे. अकोला रेल्वे पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अकोला रेल्वे स्टेशन, मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन, वाशिम रेल्वे स्टेशन ही महत्वाची रेल्वे स्टेशन येतात. दिवसेंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असताना अकोला रेल्वे पोलीसांना मात्र सन २०२४ वर्षाच्या तुलनेत सन २०२५ मध्ये गुन्हेगारी रोखण्यात यश आल्याचे दिसत आहे. सन २०२४ मध्ये एकुण ३०२ गुन्हे दाखल झालेले असून सन २०२५ मध्ये एकूण २८४ गुन्हे दाखल झालेले असून १८ गुन्हयांची घट झालेली आहे. सन २०२४ मध्ये प्लॅटफॉर्म चोरीचे एकूण १२१ गुन्हे दाखल असून त्यापैकी ६१ गुन्हे उघड केलेले आहेत. उघडकीचे प्रमाण ५०ज्ञ् होते. सन २०२५ मध्ये प्लॅटफॉर्म चोरीचे एकूण ७० गुन्हे दाखल असून त्यापैकी ४७ गुन्हे उघड केलेले आहेत. उघडकीचे प्रमाण ६७ टक्के आहे. मागील वर्षीच्या तुलनेत प्लॅटफॉर्मवर झालेल्या चोरीचे गुन्हयांमध्ये ५१ गुन्हयांची घट झालेली असून अकोला रेल्वे पोलीसांना प्लॅटफॉर्मवरील चोरी रोखण्यामध्ये चांगले यश आल्याचे दिसून येत आहे.

## अकोला महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांद्वारे रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती

प्रतिनिधी ६ जानेवारी



**अकोला:** महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने ५ जानेवारी रोजी अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे रॅली काढून शाळा परिसरांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.

या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याबाबत जागृत करण्यात येत आहे, तसेच निवडणूक जनजागृतीचे नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांच्या सक्रिय सहभागातून व नियोजनबद्ध पद्धतीने हे जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जनजागृती करण्यात येत आहेत. आजच्या जनजागृती रॅलीमध्ये पी. एम. श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला, मनपा उर्दू मुलांची शाळा क्र. ७, नायगाव, मनपा मराठी मुलांची शाळा क्र. ४, रामदास पेठ, मनपा मराठी कन्या शाळा क्र. ७, रामदास पेठ या शाळांमधील सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी हातात मतदार जनजागृतीचे फलक घेत शाळा परिसर आणि शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढली. यावेळी 'मतदान करा', 'लोकशाही बळकट करूया', 'आपला हक्क, आपले मतदान' अशा विविध घोषणांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानासाठी प्रेरित केले. या उपक्रमात जनजागृती विभागाचे संजय खराटे, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा तसेच संबंधित शाळांचे मुख्याध्यापक शैलेश शिरसाट, खान अनिस खान व सौ. हेमलता भिरड यांची उपस्थिती व मोलाचे सहकार्य लाभले. तसेच यावेळी शेख रहमान, मनुताई आसोलाकर तसेच शाळेतील शिक्षक संगीता गुजर, मंदा खिरोडकर, अनिता नवलकर, करुणा घनबहादुर, जयश्री वानखेडे, मयूर पवार, सुलभा सदाफले, सविता पांडे, भावना इटकीकर, नयना गोटे, आनुभा मस्के, खुशाल डोंगरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## शाहबाबू उर्दू हायस्कूलतर्फे क्रीडा सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी ६ जानेवारी




**आलेगाव :** येथील शाहबाबू उर्दू हायस्कूल तर्फे ठेवण्यात आलेल्या तुकडी पहिली व इयत्ता बारावी वर्गापर्यंत विद्यार्थ्यांच्या साप्ताहिक क्रीडा महोत्सव मैदानाचे उद्घाटन नूतन विद्यालयाचे अध्यक्ष सुभाषचंद्र जैन, पं.स.माजी उपसभापती इमरानखान मुमताजखान, सै.मुख्तार शाबाबू शाळेचे सीईओ इसहाक राही या मान्यवरांच्या हस्ते करून खेळास प्रारंभ करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांना मैदानी खेळांचे महत्व कळून मैदानी विविध खेळातून खेळाचे ज्ञान तसेच शारीरिक बौद्धिक विकास व्हावा या अनुषंगाने शाहबाबू उर्दू हायस्कूल आलेगाव तर्फे क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. क्रीडा सप्ताह मैदानाचे उद्घाटन एज्युकेशन सोसायटी नूतन विद्यालयाचे अध्यक्ष सुभाषचंद्र जैन, पं.स.माजी उपसभापती इमरानखान मुमताजखान, सै.मुख्तार, इसहाक राही उर्दू शाळा सी इ ओ या मान्यवरांच्या हस्ते दिनांक २ जानेवारी रोजी करण्यात आले. क्रीडा महोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाबाबू उर्दू शाळेचे सी. ई. ओ इसहाक राही सर होते.या वेळी मंचकावर पातूर पं.स.माजी उपाध्यक्ष इमरानखान मुमताजखान, माजी उपसरपंच जलालोद्दीन जुलफोद्दीन, इरफानूलहक ठेकेदार, इरफानोद्दीन, शिक्षण पालक समिती उपाध्यक्ष नय्यरखान मुर्तुजाखान, शेख आलम, अमजद खान, रविंद्र मुर्तडकर, मो मुजीब शेठ, नसीबखान (पा.शी. प्रा.उपाध्यक्ष) मो जफर सैय्यद मुक्तार (वनपाल) आदी मान्यवरांची उपस्थिती होती.सुभाषचंद्र जैन, आणि इसहाक राही यांनी मैदानी खेळांचे महत्व पटवून देताना सांगितले.की मैदानी विविध खेळांमुळे, शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक बल वाढून आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगून आजकाल प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल वरील खेळाचे प्राबल्य वाढले असून त्याला आळा घालावा.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षक मो. आसिम यांनी केले.तर आभार प्रदर्शन शिक्षक सलीम खान यांनी केले.मुख्याध्यापक मोबिन शेख, पर्यवेक्षक मो. सादिक कौसर, नईम बेग, इलियास, साजिद या शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.


## कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरुळपीर जि. वाशिम

**जाहीर लिलाव सुचना**

सर्व भंगारा खरेदी करणारे ठेकेदारांना सुचित करण्यात येते की, मंगरुळपीर कृषी उत्पन्न बाजार समिती जि. वाशिम मधील जुने लोखंडी अँगल, टिनपत्रे, तुटलेले लोखंडी शेटर्स व इतर किरकोळ भंगाराची समितीला जाहीर लिलाव करून सदर भंगाराचे दर प्रति क्विटल दराप्रमाणे विक्री करावयाची असून दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सदर भंगाराची खुली हर्रासी ठेवण्यात आली आहे. ज्या भंगार खरेदी ठेकेदारांना भंगार खरेदी करावयाचे आहे. त्यांनी उपस्थित राहावे.

**सभापती/सचिव,**
**कृषी उत्पन्न बाजार समिती,**
**मंगरुळपीर जि. वाशिम**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# दिग्रस नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी पंचशिला इंगोले विराजमान

प्रतिनिधी ६ जानेवारी



**दिग्रस :** नगरपालिका निवडणूक २०२५ मध्ये अत्यंत चुरशीच्या लढतीत उबाठा गटाच्या उमेदवार पंचशिला वाल्मिक इंगोले यांनी नगराध्यक्षपदावर विजय मिळविल्यानंतर सोमवारी (दि. ५ जानेवारी २०२६) दिग्रस नगरपालिकेच्या सभागृहात त्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे वाशिम–यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख प्रमुख उपस्थित होते. यावेळी उबाठा गटाचे पदाधिकारी, नवनिर्वाचित नगरसेवक, कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या मंचावर विजयी नगरसेवक रुस्तम पप्पूवाले, कैलास जाधव, रमजू पटेल, राम नरळे, अरुणा रत्नपारखी, सैय्यद अक्रम, बिलाल मिरावाले, अब्दुल गफ्फार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दिग्रस नगरपालिकेचे नवनियुक्त मुख्याधिकारी गिरीश पारेकर यांनी खासदार संजय देशमुख, नगराध्यक्षा पंचशिला इंगोले तसेच सर्व नगरसेवकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

पदग्रहणानंतर आपल्या भाषणात नगराध्यक्षा पंचशिला इंगोले यांनी दिग्रस शहराच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य व मूलभूत नागरी सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करून प्रामाणिक व पारदर्शक प्रशासन देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार संजय देशमुख यांनी नगराध्यक्षा व सर्व विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करत शहरातील मतदारांचे आभार मानले. दिग्रसच्या विकासासाठी केंद्र व राज्य पातळीवर आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. याप्रसंगी अपक्ष नगरसेवक सैय्यद अक्रम यांनी शहरातील तीव्र पाणीटंचाईकडे लक्ष वेधले.

नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा हा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला असून, निवडणुकीत दिलेली विकासाची आश्वासने प्रत्यक्षात कशी उतरतात, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मोरचंडी शाळेतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती हडपली

## सरपंचासह ग्रामस्थांची एसडीओकडे तक्रार

प्रतिनिधी ६ जानेवारी



**उमरखेड :** तालुक्यातील अतिदुर्गम व बंदी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोरचंडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाने आदिवासी विद्यार्थ्यांची सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती रक्कम हडपल्याचा गंभीर आरोप सरपंचासह ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार दाखल करण्यात आली असून, प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे.

मोरचंडीचे सरपंच प्रमोद राठोड यांनी ग्रामस्थांसह उमरखेड उपविभागीय अधिकाऱ्यांकडे रितसर तक्रार सादर करून संबंधित मुख्याध्यापकाविरोधात चौकशी व कडक कारवाईची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची एकूण १ लाख ५९ हजार रुपये रक्कम शालेय व्यवस्थापन समितीच्या खात्यात जमा झाली होती.

या निधीतून मोरचंडी येथील १३६ आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप होणे अपेक्षित होते. मात्र, त्यापैकी केवळ २३ विद्यार्थ्यांनाच लाभ देण्यात आला असून, उर्वरित ११३ विद्यार्थ्यांची रक्कम मुख्याध्यापक संदीप गौतम बलखंडे यांनी स्वतःच्या नावाने धनादेश काढून हडप केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

सदर प्रकार हा शासनाची फसवणूक असून, या शिष्यवृत्ती घोटाळ्याची सखोल चौकशी करून पात्र आदिवासी विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती वितरित करावी, तसेच दोषी आढळल्यास मुख्याध्यापकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या तक्रारीवर सरपंच प्रमोद राठोड यांच्यासह देविदास डाके, साहेबराव पिंपळे, मारोती रणमले, यादव वाघमारे, संजय चव्हाण, हनवता मुकाडे, अरविंद राठोड, निता वाळके व आशा जावळे यांच्या सह्या आहेत. प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

# कलगाव शिवारातील वाईन बारमध्ये चालतोय जुगार

प्रतिनिधी ६ जानेवारी

**महागाव :** महागाव तालुक्यात नदीपलीकडील कलगाव शिवारात असलेल्या एका वाईन बारमध्ये पत्त्याचा (जुगाराचा) क्लब सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

वाईन बारला केवळ मद्यविक्री व ग्राहक बसण्याचीच परवानगी असताना, येथे नियमितपणे पत्त्याचे डाव रंगत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

या कथित प्रकाराकडे दारूबंदी विभाग व पोलीस प्रशासनाचे लक्ष आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित यंत्रणांनी याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही काही नागरिकांकडून केला जात आहे.

दोन दिवसांपूर्वी या वाईन बारमध्ये वाद झाल्याची माहिती असून, नदीपलीकडील निर्जन परिसरात बार असल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी वेळीच कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

वाईन बारचा परवाना म्हणजे जुगार चालविण्याची मुभा नसते, हे स्पष्ट असताना जर येथे पत्त्याचा क्लब सुरू असेल, तर संबंधित विभागांनी तातडीने चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

कलगाव शिवारातील या वाईन बारबाबत दारूबंदी विभाग व पोलीस प्रशासन काय भूमिका घेतात, याकडे आता महागाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अंत्यविधीसाठी निघालेल्या क्रुझरचा अपघात; पाच जण जखमी

प्रतिनिधी ६ जानेवारी



**महागाव :** तालुक्यातील वाकोडी येथे अंत्यसंस्कारासाठी जात असलेल्या क्रुझर वाहनाचा पुसद–माहूर मार्गावरील वेणी फाट्यावर भीषण अपघात झाला. या अपघातात चालकासह पाच जण जखमी झाले असून, त्यातील एकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. ही घटना मंगळवारी दुपारी सुमारे एक वाजताच्या सुमारास घडली.

वाशिम तालुक्यातील शिरपूर जैन येथील पुरुष व काही महिला भगिनी महागाव तालुक्यातील वाकोडी येथे अंत्यसंस्कारासाठी क्रुझर (एम.एच. ३७ जी ७३६९) वाहनाने जात होते. वेणी फाट्याजवळील वळणावर वाहनाचा वेग अधिक असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले व क्रुझर रस्त्यालगत असलेल्या कॅनलमध्ये पलटी झाली.

सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र चालकासह पाच प्रवासी जखमी झाले असून, एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच गुंज येथील नागरिकांनी तत्काळ मदतीला धाव घेत जखमींना वाहनाबाहेर काढले व खाजगी वाहनांच्या माध्यमातून उपचारासाठी पुसद येथे रवाना केले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार क्रुझरमध्ये एकूण बारा प्रवासी होते. घटनेची माहिती मिळताच महागाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील तपास सुरू आहे.

# पारवा येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

प्रतिनिधी ६ जानेवारी

**घाटंजी :** तालुक्यातील पारवा येथील जिल्हा परिषद मराठी कन्या शाळेत थोर समाजसुधारिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी चिमुकल्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंची वेशभूषा करून 'आम्ही सावित्रीच्या लेकी' असा जागर केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका गीता मानकर (चव्हाण) होत्या. त्यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना गीता मानकर यांनी सावित्रीबाईंचा संघर्षमय जीवनपट उलगडला.

त्या म्हणाल्या, 'सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि



समाज परिवर्तनासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

**त्यांचे विचार विद्यार्थिनींनी अंगीकारणे गरजेचे आहे :** इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या वेशभूषा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमासोबतच शाळेत नवीन वर्षाचेही जल्लोषात स्वागत करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका गीता मानकर आणि शिक्षिका रत्ना नैताम यांनी परिश्रम घेतले.

# ३० हजारांहून अधिक रक्तपिशव्या संकलित

## दुर्धर आजारग्रस्तांना जीवनदायी आधार

प्रतिनिधी ६ जानेवारी

**यवतमाळ :** श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील शासकीय रक्तकेंद्राने मागील तीन वर्षांत ३० हजारांहून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. केवळ सन २०२५ या वर्षातच १० हजार २६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून, त्यामुळे सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफिलिया यांसारख्या दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांसह आपत्कालीन उपचारासाठी दाखल रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रात रक्तदान चळवळ व्यापक असली तरी कोविडनंतर बदललेल्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचा परिणाम रक्तसंकलनावर जाणवत आहे. अशा पार्श्वभूमीवर यवतमाळसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यात सातत्याने रक्तसंकलन राखणे हे आव्हानात्मक ठरत असतानाही, शासकीय रक्तपेढीने नियोजनबद्ध रक्तदान शिबिरे आयोजित करत गरजेनुसार रक्तपुरवठा सुरू ठेवला आहे.

या यशामागे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सेवाभावी संस्था, शासकीय यंत्रणा, रुग्णालय प्रशासन तसेच रक्तकेंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सामूहिक योगदान महत्त्वाचे ठरले आहे. रक्तदान हे केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरावे, यासाठी जनजागृती आणि नियमित रक्तदात्यांची साखळी उभारण्यावर भर देण्यात येत आहे.

अधिकाधिक रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी इच्छुक संस्था व रक्तदात्यांनी रक्तकेंद्र विभागातील समाजसेवा अधीक्षक आशिष खडसे व आशिष दहापूते यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय रक्तपेढीच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिष्ठाता डॉ. प्रशांत उईके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र भुयार, विभागप्रमुख डॉ. विकास येडणिकर, रक्तकेंद्र प्रमुख डॉ. जयवंत महादानी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्राध्यापक डॉ. किरण भारती, डॉ. निलिमा लोढा, डॉ. संजय खांडेकर, डॉ. विशाल नरोटे, डॉ. इरफान तुघलक, डॉ. दीपिका बानानी तसेच रक्तकेंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.

# राज्यस्तरीय हॅकेथॉनमध्ये शिक्षण सेवकाची झेप

## 'बाल सुरक्षा स्मार्ट कवच'ला राज्यात चौथा क्रमांक

प्रतिनिधी ६ जानेवारी



**उमरखेड :** राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राने उज्ज्वल कामगिरी केली असून, 'बाल सुरक्षा स्मार्ट कवच' या अभिनव प्रकल्पाने राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. राज्यभरातून निवड झालेल्या ३० उत्कृष्ट प्रकल्पांमध्ये या प्रकल्पाने आपले वेगळेपण सिद्ध केले.

हा प्रकल्प उमरखेड तालुक्यातील शिक्षण सेवक तैय्यब शेख यांनी विकसित केला आहे. बालकांवरील अत्याचार, अपहरण, अपघात, प्राणी हल्ले, साप चावणे अशा आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत मिळावी, या उद्देशाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा प्रकल्प साकारण्यात आला आहे. या वेअरेबल डिव्हाइसमध्ये SOS बटन, GPS लोकेशन, कॉल व SMS अलर्टची सुविधा असून, धोक्याच्या प्रसंगी पालक व शिक्षकांना तत्काळ सूचना मिळते.

'बाल सुरक्षा स्मार्ट कवच' हे इंटरनेटशिवायही कार्य करणारे, कमी खर्चिक व वापरण्यास सुलभ उपकरण असून, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रकल्पाची सामाजिक उपयुक्तता, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी याची दखल घेत परीक्षकांनी विशेष कौतुक केले.

मार्च २०२४ मध्ये शिक्षण सेवक म्हणून सेवेत रुजू झालेल्या शेख यांनी पहिल्याच सेवावर्षात राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला होता. सलग दुसऱ्या वर्षी पुन्हा राज्यात चौथा क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या गुणवत्तेची पुनःप्रचिती दिली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेच्या निकाल जाहीर कार्यक्रमावेळी डायट चंद्रपूरचे प्राचार्य डॉ. मत्ते, स्पर्धेचे नोडल अधिकारी व अधिव्याख्याते उपस्थित होते. त्यांनी या प्रकल्पामुळे शालेय शिक्षण अधिक सुरक्षित होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या यशाबद्दल पंचायत समिती उमरखेडचे गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाट, शिक्षण विस्तार अधिकारी चंदा ढोणे, सुकळी केंद्राचे केंद्रप्रमुख विजय इंगोले, मुख्याध्यापक शिवाजीराव देवसरकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युवराज जाधव तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# भांबरखेडा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

प्रतिनिधी ६ जानेवारी



**उमरखेड :** तालुक्यातील जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, भांबरखेडा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शुक्रवार (ता. ३) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तिरुपती मुंडे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक ज्ञानेश्वर शिंदे तर विशेष अतिथी म्हणून शिक्षिका सुषमा हिंगाडे उपस्थित होत्या. यावेळी शाळेतील विद्यार्थिनी जानवी पाटील व समीक्षा जोगदंडे यांनी अनुक्रमे जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी शाळेतील सुमारे २० विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्यावर मनोगते व्यक्त केली. प्रमुख अतिथी शिक्षिका मुक्ता कदम यांनी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला समाजसेविका व मुख्याध्यापिका असल्याचे सांगत, स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची माहिती दिली. त्या काळातील 'चूल आणि मूल' या रूढीला छेद देत त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात क्रांती घडवून आणल्याचे त्यांनी नमूद केले.

दुसऱ्या प्रमुख अतिथी शिक्षिका कु. रोशनी कदम यांनी मुलींनी शिक्षणाच्या जोरावर स्वावलंबी व सक्षम व्हावे, असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक तिरुपती मुंडे यांनी आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर असून सावित्रीबाई फुले यांचा विचारांचा वसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापिका रामेश्वरी मुंडे, सुषमा कदम, मनोज्ञ चव्हाण, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरी धनगरे व वांशिक डाखोरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन कु. अनन्या पदमे यांनी केले.

# क्रांतिज्योती सावित्रीच्या लेकींच्या सन्मान सोहळ्यात रिना टेंभुर्णे यांचा गौरव

प्रतिनिधी ६ जानेवारी



**यवतमाळ :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा यवतमाळ यांच्या वतीने आयोजित "क्रांतिज्योती सावित्रीच्या लेकींचा सन्मान सोहळा–२०२६" अंतर्गत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. हा सोहळा यवतमाळ येथील सहकार भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमात शांतीलाल मुथा फाउंडेशनच्या मूल्यवर्धन कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या टी. सी. मा. रिना निखिल टेंभुर्णे यांचा उत्कृष्ट मूल्यवर्धन प्रशिक्षण, प्रभावी अंमलबजावणी तसेच शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला.

पांढरकवडा तालुक्यातील दुर्गम, जंगलमय व हिंस्र प्राण्यांचा वावर असलेल्या भागात प्रत्यक्ष शाळा भेटी घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यवर्धन उपक्रम प्रभावीपणे राबविणे, शिक्षकांना सातत्याने मार्गदर्शन करणे व शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची दखल घेत त्यांना "क्रांतिज्योती सावित्रीच्या लेकीचा सन्मान" प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंस्कार रुजविणे, शिक्षकांना प्रेरित करणे व शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता उंचावण्यासाठी टेंभुर्णे यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थित मान्यवर, शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी व्यक्त केले.

या सोहळ्यास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ येथील अधिव्याख्याता श्रीमती मधुमती सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी महिला सक्षमीकरण, शिक्षणातील गुणवत्ता व शिक्षकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यवतमाळ हेल्थ मॅराथनमध्ये शिक्षकाचा उल्लेखनीय सहभाग

प्रतिनिधी ६ जानेवारी




**यवतमाळ :** यवतमाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या यवतमाळ हेल्थ मॅराथन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. २१ किलोमीटर, १० किलोमीटर व ५ किलोमीटर अशा विविध अंतरांच्या स्पर्धांमध्ये जिल्हाभरातील अनेक धावपटूंनी सहभाग नोंदवला.

या मॅराथनमधील १० किलोमीटर पावर रन प्रकारात JSPM शाळा, फुलसावंगी (ता. महागाव) येथे कार्यरत असलेले शिक्षक मोहम्मद मुसद्दीक यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी १ तास २० मिनिटांत १० किलोमीटरचे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण करत आपली क्षमता सिद्ध केली.

त्यांच्या या यशामुळे शाळा परिसरात, विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अध्यापनाबरोबरच आरोग्य, शारीरिक तंदुरुस्ती व सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणारा हा सहभाग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. आरोग्य संवर्धनाचा संदेश देणाऱ्या अशा उपक्रमांमध्ये शिक्षकांचा सक्रिय सहभाग समाजासाठी दिशादर्शक ठरत असून, मोहम्मद मुसद्दीक यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६

# पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...

# भ्रष्टाचाराचे सत्र, खोटे पात्र, खरे अपात्र !

## *खऱ्या लाभार्थ्यांना ठेवले वंचित * अधिकाऱ्यांनी संपत्ती केली संचित

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, म्हणजेच 'पोकरा' योजनेचा पहिला टप्पा सन २०१८ ते जून २०२४ पर्यंत मोठ्या धुमधडाक्यात राबविण्यात आला आहे.हवामान बदलाच्या काळात शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने 'पोकरा' योजनेची अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले होते.त्या अनुषंगाने या प्रकल्पाअंतर्गत अनेक योजना राबविण्यात आल्या. परंतु संबंधित कृषी सहायकाने गावातील काही दलालांच्या संगनमताने या योजनेची वाट लावली असल्याचे आता उघड होत आहे. यामध्ये खोटे पात्र असून खरे लाभार्थी अपात्र ठरविण्यात आले आहे. भ्रष्टाचाराचे सत्र सुरूच असून खऱ्या लाभर्थ्यांना वंचित ठेवण्यात आले असून भ्रष्ट अधिकाऱ्यांनी करोडोची संपत्ती संचित केली आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी केल्यास सत्य समोर येईल.**

कृषी विभागाच्या भोंगळ कारभारमुळे काही कृषी सहायकांनी ' सैराटपणातून अनुदान वाटपात ' झिंगाटपणा ' केला असल्याची माहिती आता समोर आली आहे. परिणामी कृषी सहायकासाठी दलाली करणारे १० टक्के आणि वशिल्यातले १० टक्के असे एकूण २० टक्के लाभार्थी तुपाशी, तर बाकीचे ८० टक्के लाभार्थी उपाशीच ठेवण्यात आले असल्याची धक्कादायक्क माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे रिसोड तालुक्यात पोकरा योजनेत समाविष्ट असलेल्या गावातील अनुदान वाटप संशयाच्या भोवऱ्यात असल्याची आता चर्चा जोर धरत आहे. शेलुखडसे गावात संबंधित कृषी सहायकाने नियमबाह्य पूर्वसंमती मिळवून देत एकाच कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या नावावर लाखो रुपयाची खैरात केली असल्याची बाब लाभार्थी यादी पडताळून पाहिल्यास सहज लक्षात येते. त्यामुळे कृषी सहायकाने गावातील ८० टक्के शतकऱ्यांना पोकरा योजनेच्या लाभापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले असल्याची चर्चा सदर योजनेचा पहिला टप्पा संपल्यानंतर आता उजगार होत आहे. या भ्रष्टाचाराची वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी व दोषींवर कारवाई करून झालेल्या आर्थिक अफरातफरीची सक्त वसुली करण्यात यावी अशी मागणी शेलुखडसे येथील काही शेतकरी करीत आहेत. तर काही शेतकरी उपलब्ध यादीचा पुरावा जोडून थेट जिल्हाधिकारी आणि योजनेचे प्रकल्प संचालक यांच्याकडे रितसर तक्रार करणार असल्याचे बोलत आहेत.त्यामुळे पोकरा योजनेचा दुसरा टप्पा तरी पारदर्शकपणे पार पडेल अशी अपेक्षा वर्तविण्यात येत आहे.





प्राप्त माहितीनुसार या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाचे घटक आणि शेतकरी गटासाठी दिले जाणारे घटक असे दोन गट आहेत. यात शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाअंतर्गत वृक्ष लागवड, फळबाग लागवड, शेततळे, पाणी उपसा साधने, पाईप, ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, शेडनेट हाऊस, पॉली हाऊस, हवामान अनुकूल वाणांचे पायाभूत व प्रमाणित बिजोउत्पादन, बंदिस्त शेळीपालन, अस्तरीकरण, विहीर, गांडूळ खत निर्मिती आदी अनेक योजना ७५ टक्के अनुदानावर दिल्या जातात.मात्र रिसोड तालुक्यातील योजनेत समाविष्ट असलेल्या एकूण १८ गावापैकी सर्वात बोगस प्रकार शेलुखडसे गावात झाला असल्याच्या तक्रारी पोकराचा दुसरा टप्पा सुरु झाल्यानंतर समोर येत आहेत. यात लाखो रुपये एकाच परिवारातील वेगवेगळ्या नावावर दिला असल्याचे पुराव्याणीशी गावातील ज्यांना, ज्यांना या योजनेतून हेतूपुरस्पर वगळण्यात आले किंव्हा कृषी सहायकाच्या काही निवडक दलालांनी ज्या शेतकऱ्यांना मुद्दामहून डावलले आहे असे संतप्त शेतकरी आता अनेक तक्रारी करणार असल्याचे बोलत आहेत. बोगस समूह गट, नियमबाह्य एकाच कुटुंबात एकाच घटकासाठी दिलेले अनेक लाभ आता उजगार होत आहेत. तर ट्रॅक्टर, विहीर, पाईप लाईन, फळबाग, वृक्ष लागवड, बिजोउत्पादन आदी अनेक योजनाच्या नावावर कृषी सहायकाने आपल्या मार्जितल्याच लोकांना अनुदानची खिरापत वाटले असल्याची खळबळ जनक प्रकार उघड होत आहे. या गैरप्रकारांची सखोल चौकशी करून बोगस अनुदान लाटणारे व देणाऱ्या दोषीवर सक्त वसुलीची कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे. जेणेकरून पोकरा योजनेचा नुकताच सुरु झालेला दुसरा टप्पा सुरळीत पार पडेल व सर्व समावेशक शेतकऱ्यांना या लोकाभिमुक योजनेचा लाभ मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## थोडक्यात

### निर्यात ही जिल्ह्याच्या आर्थिक विकासाची किल्ली ठरावी



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील कृषी, प्रक्रिया उद्योग व स्थानिक उत्पादनांमध्ये मोठी निर्यात क्षमता आहे.उद्योजकांनी केवळ स्थानिक बाजारपेठेपुरते न थांबता जागतिक बाजारपेठेचा विचार करावा. निर्यात वाढल्यास रोजगारनिर्मितीला चालना मिळून जिल्ह्याचा सर्वांगीण आर्थिक विकास साधता येईल.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाच्या निर्देशानुसार 'महा निर्यात – इग्नाइट कन्व्हेन्शन २०२६' या उपक्रमांतर्गत वाशिम येथे आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय निर्यात कार्यशाळा उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाली. ही कार्यशाळा हॉटेल दानीश एम्पायर येथे पार पडली.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी कुंभेजकर प्रतिपादन करतांना बोलत होते.यावेळी जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घूले, उद्योग सहसंचालक निलेश निकम, डीजीएफटीचे यंग प्रोफेशनल गणेश सोनवणे, एक्झिक्युटीव ऑफिसर संकेत निनावे, अधीक्षक अभियंता व समन्वय अधिकारी, मैत्री कक्ष प्रियदर्शिनी सोनार , जी.एम.इंडिया सेरेमिक सोल्यशन संदीप धोटे, एई टीमचे सीए अंकित गुप्ता,बीआरएन मोबीलीटी कोफाऊंडर संकेत राजे , पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधीक्षक सी.व्ही. रामा रेड्डी , सहाय्यक व्यवस्थापक उमेश रानोलिया,कृषि उपसंचालक हिना शेख, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आरिफ शहा, आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योग सहसंचालक निलेश निकम यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी 'महा निर्यात' उपक्रमामागील शासनाची भूमिका स्पष्ट करताना, जिल्हास्तरावर निर्यातक्षम उद्योग उभारण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वाच्या असल्याचे नमूद केले. जिल्ह्यातील उद्योजकांनी या संधीचा लाभ घेऊन निर्यात क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.या कार्यशाळेचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील उद्योजक, निर्यातदार, औद्योगिक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या , स्टार्टअप्स तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना निर्यात प्रक्रियेबाबत सखोल व व्यावहारिक मार्गदर्शन देऊन स्थानिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत पोहोचवणे हा होता. जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील उद्योजकांनी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.कार्यशाळेमध्ये निर्यात प्रक्रिया व नोंदणी, परदेशी बाजारपेठेत प्रवेश करण्याच्या संधी, निर्यात प्रोत्साहन योजना व शासकीय अनुदाने, कृषी व प्रक्रिया उद्योगांसाठी निर्यात क्षमता, एफपीओ व एमएसएमई साठी निर्यात धोरणे तसेच जिल्हा निर्यात केंद्र संकल्पना या विषयांवर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित उद्योजकांच्या प्रश्नांना तज्ज्ञांनी समाधानकारक उत्तरे दिली.या कार्यशाळेत विदेश व्यापार संचालनालय, उद्योग विभाग, निर्यात क्षेत्रातील तज्ज्ञ, वित्तीय संस्था प्रतिनिधी तसेच संबंधित शासकीय अधिकारी यांनी सहभाग घेतला. शासकीय योजनांचा प्रभावी वापर करून निर्यात व्यवसाय सक्षम करण्यावर भर देण्यात आला.समारोपप्रसंगी जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घुले यांनी उपस्थितांचे आभार मानत जिल्ह्यातील उद्योजकांनी निर्यात क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## कोण हलविते सुत्र, हेराफेरीसाठी सर्व एकत्र

# बोगस आदेश पत्र, भ्रष्टाचाराचे सत्र

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •






रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांच्या जमिनीच्या फेरफार प्रकरणात तहसिलदारांचाही 'सहभाग ' असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. चाटेंच्या जमिनीचा फेरफार करण्याचा आदेशच बनावट असल्याची माहिती महसूल अधिका—यांनी दिलेल्या पत्रानुसार उघडकीस आली आहे. या अफलातून प्रकारामुळे रिसोडच्या तहसिलदारासह त्यांच्या अधिनस्थ सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रिसोड तालुक्यातील जवळा येथील गट क्रमांक ५ / १ मध्ये रमेश चाटे व त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने एक हेक्टर १६ आर वडीलोपार्जित जमिन शिल्लक होती.ती जमिन त्यांचे शेताचे शेजारी जाधव वहिती करून चाटे कुटुंबाला दरवर्षी त्या शेतीचा मोबदला देत होते. काही वर्षाअगोदर जाधव यांनी चाटे यांना मोबदला न देता अनधिकृतपणे चाटेंची जमिन हडपण्याचा प्रकार केला होता. या संदर्भात चाटे यांनी रिसोड येथील मा. दिवाणी न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणाचा निकालही चाटे यांच्या बाजूने लागला होता.मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार रमेश चाटे व त्यांचे नातेवाईक न्यायालयातील बेलिफ घेवून शेताचा ताबा घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी जाधव यांनी रमेश चाटेंच्या शिल्लक असलेल्या गट क्रमांक ५/१ चा फेरफार झालेला ७/१२ बेलिफ ला दाखविल्यानंतर चाटे कुटुंबियांना धक्का बसला. चाटे यांनी या फेरफारासंदर्भात कागदपत्रांची मागणी करून त्या कागदपत्रांची चौकशी केली. त्यानंतर चाटे यांना 'या' प्रकरणात अनेक जनांनी मलिदा लाटून चाटेंची जमिन हडपल्याची गंभीर बाब निदर्शनास आली चाटे यांनी मा.दिवाणी न्यायलय,रिसोड येथे दाखल केलेल्या शेताच्या मालकी हक्काच्या प्रकरणाचा निकाल २९/०४/२०२५ रोजी लागला होता. त्या निकालात गैरअर्जदार तुकाराम यांनी चाटे कुटुंबियांना त्यांच्या शेताचा ताबा देण्याचे आदेश दिले होते. चाटे यांच्या शेताचे प्रकरण गावातील तलाठी,मंडळ अधिकारी, महसूल अधिकारी व जवळा परिसरात माहिती असतांनाही रिसोड तहसिल कार्यालयातील कथित भ्रष्ट मंडळीने जाधव यांचेकडून मोठ्या प्रमाणात मलिदा लाटून दिनांक २६/०६/२०२५ रोजी आदेश क्रमांक रा.मा.क्र.आर.टी.एस.५९/जवळा/१ ३५/२०२५ नायब तहसिलदार, रिसोड यांच्या आदेशा नुसार चाटे यांच्या एक हेक्टर १६ आर जमिनीचा फेरफार जाधव यांच्या नावाने केल्याची नोंद फेरफार क्रमांक १२९९ मध्ये करण्यात आली आहे.तसेच या फेरफार प्रकरणात दिनांक १७/०२/१९६९ चे खरेदी खत दस्त क्रमांक २९९/१९६९ चा आधार घेतला आहे. या खरेदीखतामध्ये तिन एकर शेती चाटे यांचेकडून जाधव यांनी घेतल्याचे नमूद केले असून त्या तिन एकर शेतीचा फेरफार १९८५ मध्येच करण्यात आलेला आहे. आता पुन्हा 'त्याच' खरेदी खताचा उल्लेख फेरफार क्रमांक १२९९ मध्ये केला आहे. त्या खरेदी खतात तिन एकर शेत खरेदीची नोंद आहे.तर रमेश चाटे व त्यांच्या कुटुंबियांची गट क्र.५/१ मध्ये एक हेक्टर १६ आर जमिन शिल्लक आहे. विरोधी लोकांकडून भरपूर मलिदा लाटल्याने 'हा' फेरफार करताना तलाठी,मंडळ अधिकारी,नायब तहसिलदार यांनी शेताच्या क्षेत्रफळाची शहानिशा केली नाही.तसेच चाटे कुटुंबातील सदस्यांना फेरफाराची नोटीसही न बजावता हा फेरफार झाल्याची चर्चा आहे.या शेताच्या फेरफाराला मंजूर करतांना तहसिदाराचा 'थंब' लावावा लागतो,तहसिलदारांनीही या फेरफारातील कागदपत्रांची कोणतीही शहानिशा न करता या फेरफाराला मंजूरी देवून 'त्यांचा'ही सहभाग असल्याची गंभार बाब निदर्शनास आली आहे.

**जवळा येथील बनावट फेरफार प्रकरणात तहसीलदाराचाही सहभाग**

**२६ जून २०२५ आदेशच बनावट' याच 'बनावट आदेशा'नुसार चाटे कुटुंबियांच्या जमिनीचा भ्रष्टांनी केला फेरफार**


**१७ फेब्रुवारी १९६९ च्या खरेदीखतात ३ एकर शेत खरेदी केल्याची नोंद**

**तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार, तहसिलदार यांनी 'त्या' खरेदी खताची शहानिशा न करता व जमिनीचे क्षेत्रफळ न पाहता चाटेंच्या जमिनीचा केला फेरफार**

**रिसोड तालुक्यात महसूल विभागात भ्रष्टांचा भरणा**

**अधिकारी, कर्मचारी झालेत मालामाल**

**महसूलमंत्री ना. बावनकुळे यांचेकडे रमेश चाटेंची पुराव्यानिशी तक्रार**




### 'तो' आदेश बनावट

**रा.मा.क्र.आर.टी.एस.५९/जवळा/१३५/२०२५ आदेश दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या आदेशाची नक्कल चाटे यांनी रिसोड तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये मागितली असता रिसोड तहसिलमधील प्रस्तुतकार १, २ आणि ३ यांचे कार्यालयात 'या' आदेशाची माहितीच उपलब्ध नसल्याची बाब उघडकीस आली आहे. रमेश चाटे व त्यांच्या कुटुंबियांची वडीलोपार्जित जमिन हडपण्यासाठी 'या' बनावट आदेशाचा आधार घेण्यात आल्याने रिसोड तहसिल कार्यालयात अशा प्रकारे अनेक बनावट आदेश काढून अनेक लोकांच्या व शासनाच्या मालकीच्या जमिनीची भ्रष्ट अधिकाऱ्यांनी विल्हेवाट लावून लाखोंचा मलिदा लाटल्याची तहसिल परिसरात चर्चा आहे.**

# कौशल्य विकास आराखड्याच्या अंमलबजावणीला चालना !

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारिणी समितीचा सविस्तर आढावा

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**जिल्ह्यातील युवकांना रोजगारक्षम बनविणे, स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच उद्योजकता व नाविन्यतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास आराखड्याच्या अनुषंगाने कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारिणी समितीची सविस्तर बैठक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.**



या बैठकीत जिल्ह्यातील सध्याच्या व भविष्यातील रोजगार संधी लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व प्रभावी समन्वय यावर सखोल चर्चा करण्यात आली.जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, युवकांना केवळ प्रशिक्षण देणे नव्हे तर त्यांना प्रत्यक्ष रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

त्यासाठी उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम राबविणे, स्थानिक पातळीवरील उद्योग, शेतीपूरक व्यवसाय, सेवा क्षेत्र यांच्याशी प्रशिक्षण संस्थांचा समन्वय वाढविणे आवश्यक आहे. जिल्हा कौशल्य विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करून अधिकाधिक युवकांना प्रशिक्षित करून रोजगाराभिमुख बनवावे, असे त्यांनी निर्देश दिले.बैठकीत कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील प्रशिक्षण केंद्रांची सद्यस्थिती, प्रशिक्षणार्थ्यांचा सहभाग, रोजगार जोडणी (प्लेसमेंट) व स्वयंरोजगार उपक्रम याबाबत सादरीकरण करण्यात आले.

यावेळी सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे, सहाय्यक नियोजन अधिकारी संजय राठोड, कौशल्य विकास अधिकारी वैशाली पवार यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेतला. अद्ययावत अभ्यासक्रम, उद्योग सहकार्य व रोजगार संधी याबाबतचा आढावा यावेळी घेण्यात आला . विविध विभागांनी समन्वयाने काम करून युवकांच्या कौशल्य विकासातून जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीला गती देण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सर्व संबंधित यंत्रणांनी ठरविलेल्या उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करावी, प्रशिक्षण संस्थाना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करावी.नियमित आढावा घ्यावा व जिल्हा कौशल्य विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देशही दिले. किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत छाननीअंती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एकूण १३ संस्थांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

# कार्यवाहीसाठी प्राप्त तक्रारी तात्काळ निकाली काढा - जिल्हाधिकारी

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ; १ तक्रार अर्ज निकाली



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सर्वसामान्य व्यक्तींना आपल्या वैयक्तिक तक्रार, अडचणी सोडविण्यासाठी लोकशाही दिन कार्यवाहीची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यवाहीसाठी सर्वसामान्य नागरिक विविध स्तरावर प्रलंबित प्रकरणांविषयी, वैयक्तिक अडचणींविषयी तक्रारी करीत असतात. लोकशाही दिन कार्यवहीसाठी प्राप्त तक्रारींवर तात्काळ संबंधित यंत्रणेने निर्णय घेवून सदर तक्रार निकाली काढावी, अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिल्या.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन कार्यवाहीचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार जानेवारी महिन्याच्या कार्यवाहीचे आयोजन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, गृह शाखेचे अपर पोलीस अधीक्षक धर्मा सोनोने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप, भूमी अभिलेखच्या अधीक्षक शिल्पा सानप, महावितरणचे कार्यकारी अभियंता जीवण चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आजच्या लोकशाही दिन कार्यवाहीत जि.प. बांधकाम विभाग यांच्यासंदर्भातील एक तक्रार निकाली काढण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात थंडी पुन्हा वाढली

प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला :** मध्यंतरी दोन दिवस थंडीचा जोर ओसरला होता. मात्र काल संध्याकाळपासून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच पहाटेच्या सुमारास गारवा मोठ्या प्रमाणात जाणत असल्याने आरोग्यावरील विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, डोकेदुखी अशा आजाराने डोके वर काढले आहे.

# आमदार रणधीर सावरकर यांच्या पुढाकाराने समतोल विकास : खासदार अनुप धोत्रे



प्रतिनिधी ६ जानेवारी

**अकोला :** महानगर आणि ग्रामीण भागाचा समतोल विकास आमदार रणधीर सावरकर यांनी करून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबुतीकरणासोबत शहरी नागरी समस्याला दूर करण्याचे काम केले. शेतकऱ्यांच्या आणि ग्रामस्थांच्या समस्या दूर करून परिसर सुजलाम सुफलाम करण्याचा संकल्प घेऊन कार्य केले. त्यामुळे जनता जनार्दन भाजपाच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

अकोला पूर्व मतदार संघातील पळसोद येथील कोल्हापुरी बंधारा व मरोडा दिनोडा रोडवरील संरक्षण भिंत या दोन्ही कामांचे भूमिपूजन खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

अकोला जिल्ह्यात माजी मंत्री संजय भाऊ धोत्रे यांनी केलेल्या विकास कामाचा आणि त्यांच्या मार्गदर्शनात आमदार रणधीर सावरकर आणि खासदार अनुप धोत्रे जनतेला अनुरूप कामातून सर्वस्पर्शी विकास करण्याचा प्रयत्न करत आहेत. खासदार धोत्रे, आमदार सावरकर, पालकमंत्री आकाश फुंडकर करत असल्याचे जिल्हा भाजप अध्यक्ष संतोष शिवरकर म्हणाले. कार्यक्रमाला राजूभाऊ नागमोते, विठ्ठल वाकोडे, विजुभाऊ सोळंके, मधुकर पाटकर, विनोद मंगळे, शिवाजीराव देशमुख, मोहन सावरकर, विवेक भरणे, ज्ञानेश्वर आडे, दादाभाऊ पेटे, प्रवीण डिक्कर, सपकाळ, अक्षय काळे, सरपंच विजय पाटेकर, माजी उपसरपंच गोकुळ तिरुख, अशोक गावंडे, साहेबराव राणे, प्रदीप डांबरे, सुरेश डांबरे, मनोहर मुरकुटे, अनिल राठी, अनिल गावंडे, संदीप गावंडे, रामदास पाटेकर, दिनकरराव अघडते, नंदकिशोर देवळे, रवींद्र मानकर, विवेक भरणे पवन चिपडे राजूभाऊ कळसकनिर्गुण गावंडे सरपंच सुलभाताई गावंडे रजनीताई गावंडे मोहन गावंडे विठ्ठल गावंडे मनोहर गावंडे सारंधर गावंडे अनता गावंडे तेजराव पाटील गावंडे व परिसरातील नागरिक, शेतकरी, भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# विटेक्स 2026 प्रदर्शनीचा थाटात समारोप

प्रतिनिधी ६ जानेवारी






**अकोला :** शहरातील गोरक्षण संस्थानच्या मागील मैदानावर विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, अकोला यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय विटेक्स २०२६ या भव्य व्यावसायिक प्रदर्शनीचा सोमवारी सायंकाळी ५ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात समारोप झाला. विदर्भातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या व्यावसायिक प्रदर्शनांपैकी एक असलेल्या या प्रदर्शनीला विदर्भासह तब्बल १.५० लाख अकोलाकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

समारोपीय कार्यक्रमाला अकोला जिल्ह्याच्या जिलाधिकारी श्रीमती वर्षा मीणा, अकोला महानगरपालिका आयुक्त सुनिल लहाने, मार्बल ट्रिनिटी रिअल इस्टेट एलएलपीचे भागीदार सुनील इन्नाणी, नागपूर कॅमिटचे अध्यक्ष दिपेन अग्रवाल, नागपूर एडचे सचिव विजय शर्मा, विदर्भ टीम कॅटचे अध्यक्ष विनोद कलंत्री, कालुराम फूड प्रा. लि. चे संचालक शिवप्रकाश रुहारिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिलाधिकारी वर्षा मीणा म्हणाल्या की, विदर्भातील उद्योगांना अशा उपक्रमांमुळे निश्चितच चालना मिळेल. भविष्यात या भागातील लहान-

## ♦ विदर्भासह अकोलावासियांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मोठ्या उद्योग व व्यवसायांच्या माध्यमातून युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यांनी विटेक्स २०२६ च्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे विशेष कौतुक केले. प्रदर्शनीत विदर्भातील उत्पादन, किरकोळ विक्री आणि सेवा क्षेत्रातील विविध दालने उभारण्यात आली होती. 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पनेवर आधारित सेमिनार्सद्वारे विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले. चार दिवस चाललेल्या या प्रदर्शनीला शहरासह लगतच्या परिसरातील नागरिक, व्यापारी व उद्योजकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

अकोला आणि संपूर्ण विदर्भातील व्यापारी वर्गामध्ये प्रदर्शनामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमामुळे औद्योगिक विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. प्रदर्शनात खाद्य संस्कृती तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांनाही विशेष महत्त्व देण्यात आले. विटेक्स प्रदर्शनाच्या भव्यदिव्य आणि यशस्वी आयोजनात चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता, सचिव निरव वोरा, वरीष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री, सहसंयोजक राहुल मित्तल समवेत उपसमिती सदस्य पंकज कोठारी, राजकुमार राजपाल, अमरीश पारेख, केतन गुप्ता, रितिक अग्रवाल, श्रीकांत गोयनका, आशुतोष वर्मा, ओम अग्रवाल, मनोज मोर, इंजि. कपिल ठक्कर, भूषण अग्रवाल, सलीम डोडिया, चंचल भाटी, प्रणय कोठारी, हिमांशू खंडेलवाल, प्रतीक अग्रवाल, यश सिंघनिया, निलेश अग्रवाल, मनोज अग्रवाल, पियुष खंडेलवाल, राहुल गोयनका, कमल खंडेलवाल, शैलेश अलीमचंदानी, मनीष केडिया, शैलेंद्र कागलीवाल, गुलशन कृपलानी, नमन खंडेलवाल, रोहित रुंगटा, प्रतुल भारूका, सज्जन अग्रवाल, शांतीलाल भाला, रोहित खंडेलवाल, दिलीप खत्री, योगेश अग्रवाल, नितीन बियाणी, निर्मल समदाडिया, सौ रजनी महल्ले, सौ दिपाली देशपांडे, सौ. लीना आर्या, सौ. रविता शर्मा, निलेश अग्रवाल, देवांग जैन, सीए जितेश अग्रवाल, कृष्णा शर्मा, हरिष लाखानी, मनोज खंडेलवाल, ॲड. सुभाषसिंह ठाकूर, माजी अध्यक्ष रमाकांत खेतान, विक्रमादित्य गोयनका, श्रीकिसन अग्रवाल, अशोक दालमिया, अशोक गुप्ता, वसंत बाछुका, निरंजन अग्रवाल, कमलेश वोरा, रमाकांत खंडेलवाल, विजय पनपालिया, राजकुमार बिलाला, नितीन खंडेलवाल, बिपिन गांधी खामगाव, दीपक वाटमारे बार्शीटाकळी, दिनेश पालडीवाल शेगाव, अवीन अग्रवाल, नितीन भारुका मूर्तिजापूर, महेन्द्र तरडेजा अकोट, प्रमोद अग्रवाल खामगाव आदींनी परिश्रम घेतले.



◆वाशीम बायपास चौकात शाळकरी विद्यार्थ्यांच्या ऑटोला कारने धडक दिली. मंगळवारी सकाळी ही घटना घडली. अपघात घडल्याचे कळताच घटनास्थळी मोठा जमाव जमला होता. काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. किरकोळ जखमींवर उपचार करण्यात आला. जुने शहर पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभे संदर्भात शिंदे गटाची महत्त्वाची बैठक

प्रतिनिधी ६ जानेवारी



**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिंदे पक्षाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांची महापालिका निवडणूक संदर्भात बुधवार, ७ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता जुन्या शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर जाहीर सभा होणार आहे. सभेच्या अनुषंगाने आज हॉटेल सेंटर प्लाझा मध्ये महत्त्वाची बैठक झाली.

मंत्री संजय राठोड, माजी आमदार श्रीकांत देशपांडे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, विप्लव बाजोरिया, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर, उपजिल्हा प्रमुख योगेश अग्रवाल, राजेश मिश्रा, अश्विन नवले, उषा विरक यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेच्या नियोजना विषयी संजय राठोड यांनी मार्गदर्शन केले. उद्याची सभा शिंदे पक्षाच्या उमेदवारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. सभा यशस्वी होण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी परिश्रम घ्यावे. तसेच नागरिकांनी सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले. बैठकीचे संचालन योगेश अग्रवाल यांनी केले. बैठकीला चांगली उपस्थिती होती.

# प्रभाग 3 मध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचाराचा झंझावात

प्रतिनिधी ६ जानेवारी



**अकोला :** प्रभाग क्रमांक ३ हा जठारपेठ, न्यू तापडिया नगर, निबंधे प्लॉट, उत्तरा नगर असा वेढलेला आहे. या प्रभागात भाजपचे दमदार पॅनल असून प्रचाराचा झंझावात दिसत आहे. माजी नगरसेवक तसेच विकासाची दृष्टी असलेले सागर प्रकाशराव शेगोकार या प्रभागात पुन्हा भाग्य आजमावत आहेत. तर अभियंता प्रशांत गोविंदराव जोशी, नीतू बबलू जगताप आणि शशिकला सतीश काळे पहिल्यांदा भारतीय जनता पक्षाचे उमेदवार म्हणून उभे आहेत.

प्रभाग ३ ड मध्ये सागर शेगोकार, ३ क मध्ये प्रशांत जोशी, ३ ब मध्ये नीतू जगताप तर ३ अ मध्ये शशिकला काळे निवडणूक लढवित आहेत. दररोज प्रभाग पिंजून काढत आहेत. सोमवारी उत्तरा नगर तसेच परिसरातील घराघरात संपर्क साधला. तर मंगळवारी सकाळ पासून निबंधे प्लॉट भागातील मतदारांनी संपर्क सुरू आहे. सकाळ ते संध्याकाळ पर्यंत सर्वजण प्रचारात व्यस्त असतात.

अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांच्या माध्यमातून हद्दवाढ निधीतून जी विकास कामे या भागात झाली तसेच माजी नगरसेविका गीतांजली शेगोकार, बबलू जगताप, सतीश काळे यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामांमुळे मतदार बंधू भगिनींकडून उमेदवारांचे स्वागत केले जात आहे. भाजपचे पॅनल दमदार आहे तसेच मतदारांना विकासाचा विश्वास दिला जात आहे. त्याचा फायदा चारही उमेदवारांना निश्चित होईल असे प्रभागात बोलले जात आहे. गितांजली शेगोकार, अपूर्वा कुळकर्णी, प्रवीण भिवगडे, आशिष अडसड, शिवशंकर झामरे, पवन भैय्यावार आदिंसह शेकडो कार्यकर्ते प्रचार करीत आहेत.

# झापे हॉस्पिटलचे रामदास पाटील कोलखेडे यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी ६ जानेवारी

## ♦ डॉक्टर, समाजसेवक, राजकीय पुढाऱ्यांची उपस्थिती




**अकोट:** येथे अंजनगाव रोडवर गजानन नगरात श्री शिवाजी शाळेसमोर झापे हॉस्पिटलचे भव्य दिव्य उद्घाटन रविवार ४ ला सकाळी ९ वाजता रामदास पाटील कोलखेडे यांनी फित कापून प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला.

रुईखेडचे झापे कुटुंब असून आपल्या परिसरात वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी. आदिवासींना व इतरही नागरिकांना डॉक्टरी पेशातून आपण सेवा देऊ त्या शब्दांना जागत डॉ. अजिंक्य झापे एमबीबीएस, एफआयएम, एफआयसीएम, इंटरनल मेडिसिन ही पदवी वयाच्या २८ व्या वर्षी प्राप्त केली.

वैद्यकीय सेवा तसेच प्रशस्त हॉस्पिटल बांधून जनतेच्या सेवेत आज झापे हॉस्पिटल अविरतपणे रुजू झाले आहे. झापे हॉस्पिटलच्या भव्य दिव्य उद्घाटन सोहळ्याला अकोट शहरातील नामवंत दिग्गज डॉ गावंडे, डॉ.हेडा डॉ.वालसिंगे व राजकीय क्षेत्रातील नगराध्यक्ष मायाताई धुळे, गोपाल मोहड, डॉ. ज्ञानेश्वर मानकर, अनिल गावंडे, नाना हिंगणकर, संजय गावंडे, प्रभाकर मानकर, शाम गावंडे, गणेश बरेठिया, अचल बेलसरे , अमोल पालेकर, मनीष कराळे, कैलास गोंडचर, सुरेश कराळे, मोतीशेठ तेजवाणी, दिलीप बोचे, अशा राजकीय पुढारी व समाजसेवकांनी उद्घाटन सोहळ्याला उपस्थिती लावली, यावेळी डॉ. अजिंक्य झापे यांना सर्व आकोट जिल्ह्यांमधील सर्व स्तरातील डॉक्टरी पेशात पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या सकाळी ९ वाजता पासून तर रात्री ९ वाजेपर्यंत पाहुण्यांची रेलचेल व फुल पुष्पगुच्छ यांची उधळण सुरूच होती उद्घाटन स्थळी सर्व पाहुण्यांना उत्तम जेवणाची व्यवस्था केली होती. स्पेशल आयसीयू सेंट्रल ऑक्सिजन प्रणाली, ईसीजी मल्टीपॅरा मोनिटर, सेक्शन मशीन, सिरीज पंप नेबुलायझेशन, इन्फ्लुजन सिरीज पंप, ग्लुकोमीटर, ऑक्सिमीटर, जनरल वार्ड ,स्पेशल रूम रुग्णांसाठी उपलब्ध राहतील. ग्रामीण तसेच आदिवासी, शहरी भागातील रुग्णांना आरोग्यसेवा देण्यास उपक्रम सुरू केले आहे. रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिरांचे खेड्यापर्यंत आयोजन करण्यात येत आहे. रुग्णांना अत्यंत उत्तम अल्पशा दरात अद्ययावत सेवेत आवश्यक सुई सुविधा उपलब्ध सेवा करून देण्याचा मानस आहे असे डॉ. अजिंक्य झापे म्हणाले.

# 'युवा नेत्या' ची तत्परता फोन फिरवला आणि यंत्रणा कामाला लागली

प्रतिनिधी ६ जानेवारी

## ऐन महापालिका निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत सुटला पाणीप्रश्न सागर भारुका यांच्या 'गतीमान' कार्याचा अनिकटवासीयांना अनुभव



**अकोला :** निवडणुकीचे वातावरण म्हटले की सहसा आश्वासनांचा पाऊस पडतो. 'निवडून आलो तर हे करू, ते करू,' अशी वाक्ये कानावर पडत असतानाच, प्रभाग क्रमांक १२ (ड) मध्ये मात्र एक वेगळाच अनुभव नागरिकांना आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार सागर भारुका यांनी प्रचाराच्या दरम्यान केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती करून दाखवत 'गतीमान नेतृत्व' कशाला म्हणतात, याचा प्रत्यय दिला आहे.

प्रभाग १२ मधील सिव्हील लाईन आणि खोलेश्वर परिसरात प्रचाराचा जोर सुरू असताना, युवा नेता सागर भारुका अनिकट भागात पोहोचले. तेथे नागरिकांशी संवाद साधताना एक गंभीर समस्या समोर आली—ती म्हणजे भर हिवाळ्यात जाणवणारी भीषण पाणी टंचाई. येथील बोअरवेल नादुरुस्त असल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. नागरिकांच्या तक्रारी ऐकताच सागर भारुका यांनी क्षणाचाही विलंब लावला नाही. त्यांनी निवडणुकीच्या धामधुमीतही प्रशासकीय यंत्रणेला तत्काळ फोन लावला. 'लोकांना पाणी मिळत नाहीये, पंप आजच्या आज दुरुस्त झाला पाहिजे,' असा खणखणीत आदेश त्यांनी दिला. त्यांच्या या शब्दांमागचा आत्मविश्वास आणि 'नेता नसून स्थानिकांचा मुलगा' ही त्यांची ओळख किती सार्थ आहे, हे उपस्थित नागरिकांनी प्रत्यक्ष अनुभवले. सागर भारुका यांच्या आदेशानंतर अवघ्या काही तासांतच बोअर दुरुस्तीचे कामगार घटनास्थळी दाखल झाले. बघता बघता नादुरुस्त पंप दुरुस्त झाला आणि स्थानिकांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला. या मोहिमेत गोलू शर्मा, कुणाल शर्मा, आकाश ठाकूर, शुभम बुंदेले, दीपेश ठाकूर आणि निलेश श्रीनाथ यांनी सक्रिय सहभाग नोंदवत मोलाची मदत केली. प्रचाराच्या काळातच लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारा नेता पाहून अनिकट भागातील रहिवासी भारावून गेले आहेत. 'नेते येतात आणि आश्वासन देऊन जातात, पण सागर भारुका यांनी काम करून दाखवले,' अशी भावना एका स्थानिक नागरिकाने व्यक्त केली. धाडसी निर्णयक्षमता, कामाची गती आणि जनसेवेची तळमळ यांमुळे युवा नेता सागर भारुका सध्या संपूर्ण प्रभागात चर्चेचा विषय ठरले आहेत. प्रभाग १२ च्या विकासकामांना गती देणारा हा 'तडफदार' चेहरा आता निवडणुकीच्या मैदानात अग्रेसर दिसत आहे.

◆'लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी निवडून येण्याची वाट कशाला पाहायची? सत्ता असो वा नसो, जनतेची सेवा हीच आमची प्राथमिकता आहे.'
**– सागर भारुका**

# आचारसंहितेच्या काटेकोर पालनासाठी मनपा 'ॲक्शन मोड'वर !

प्रतिनिधी ६ जानेवारी

## ♦ संबंधितांवर होणार 'एफआयआर दाखल

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीचे वातावरण दिवसेंदिवस तापत असून, आता प्रशासनही सज्ज झाले आहे. शहरात निवडणुकीच्या आचारसंहितेचा भंग होऊन नये, त्याचे काटेकोर पालन व्हावे, यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे, यासाी महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. निवडणूक काळात परवानगीशिवाय फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग्स, कटआउट्स लावून आचारसंहितेचा भंग केल्यास संबंधित उमेदवार, पक्ष व कार्यकर्त्यांविरोधात थेट 'एफआयआर' दाखल करण्यात येणार असल्याचा सूचक इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे. महापालिका निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून शहरातील प्रमुख चौक, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, झोन कार्यालयांच्या हद्दीत मो्या प्रमाणावर प्रचार साहित्य लावण्याचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे शहराचे सौंदर्य बिघडत असून, वाहतूक व नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. महापालिका प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सूचनेनुसार, निवडणूक प्रचारासाी केवळ निवडणूक आयोग व महापालिकेने निश्चित करून दिलेल्या ठिकाणीच फ्लेक्स व बॅनर लावण्यास परवानगी राहणार आहे. महापालिकेच्या झोननिहाय पथकांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले असून, शहरभर नियमित पाहणी करून नियमभंग करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, नागरिकांनीही आचारसंहितेचा भंग होत असल्याचे आढळल्यास तत्काळ महापालिका प्रशासन किंवा नोडल अधिकारी तथा उपायुक्त विकास विजय पारतवार यांच्याकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK